

## जांभळाचे झाड
(कथा)

कृष्ण चंदर
अनुवाद । चंद्रकांत भोंजाळ

ऑनलाइन आवृत्ती

संस्थापक
साने गुरुजी

# साधना

Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१३ जून २०२०
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

। साने गुरुजी स्मृती : आंतरभारती अंक ।



دروازے
کھول دو

# उघडा, दरवाजे उघडा...!
(नाटक)

कृष्ण चंदर

अनुवाद : भारत सासणे

## साधना साप्ताहिकाचे

# डिजिटल अर्काइव्ह

weeklysadhana.in/archive

**पहिल्या टप्प्यातील पूर्वार्ध कार्यान्वित झाला...**

७२ वर्षांची परंपरा असलेल्या साधना साप्ताहिकाच्या 'डिजिटल आर्काइव्ह'चा पहिला टप्पा
हीरकमहोत्सवानंतरच्या बारा वर्षांचा (२००८ ते २०२०) आहे,
त्यातील अलीकडच्या सहा वर्षांचे सर्व अंक या अर्काइव्हवर उपलब्ध आहेत... कसे?

१. अलीकडच्या सहा वर्षांतील म्हणजे २०१४ ते २०२० या काळातील सर्व म्हणजे ३०० अंक pdf स्वरूपात जसेच्या तसे पाहता/वाचता येतील.

२. या ३०० अंकांत मिळून अडीच हजारांपेक्षा अधिक लेख आहेत, ते सर्व युनिकोड मध्येही उपलब्ध आहेत.

३. हे सर्व अडीच हजार लेख, लेखकांच्या नावानुसार उपलब्ध आहेत, म्हणजे प्रत्येक लेखकाचे लेख एकत्रितपणे इथे वाचता येतील.

४. हे सर्व अडीच हजार लेख विषयानुसार उपलब्ध आहेत. उदा. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, साहित्यविषयक.

५. हे सर्व अडीच हजार लेख लेखनप्रकारानुसार उपलब्ध आहेत. उदा. संपादकीय, मुलाखत, दीर्घ लेख, प्रतिसाद.

६. हे सर्व अडीच हजार लेख आणि ३०० अंकांच्या pdf डाऊनलोड करता येतात, email वा whats app द्वारे पाठवता येतात.

७. सध्या हे सर्व अंक व सर्व लेख विनामूल्य उपलब्ध आहेत..

(या आधीच्या सहा वर्षांचे म्हणजे २००८ ते २०१३ या काळातील सर्व ३०० अंक
वरीलप्रमाणेच उपलब्ध करून देत आहोत, १५ ऑगस्ट २०२० रोजी.)

संपर्क **साधना साप्ताहिक / डिजिटल अर्काइव्ह**

४३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३० weeklysadhana@gmail.com । Ph. 02024451724 । Mob.9545005138

२ । साधना : १३ जून २०२०
Date of Publication : 4-6-2020

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१३ जून २०२०
वर्ष ७२ / अंक - ४३
संपादक :
**विनोद शिरसाठ**
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे** ४११०३०. येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635
वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ८०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १६०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २४०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

## साने गुरुजी स्मृती : आंतरभारती अंक
## उघडा, दरवाजे उघडा...!

४ **संपादकीय :**
**अशी नाटके कालबाह्य व्हायला हवीत...!**

७ **नाट्यसंहिता**
**उघडा, दरवाजे उघडा...!**
लेखक : कृष्ण चंदर
अनुवाद : भारत सासणे

२५ **चिंतन :**
**लोकसमजुतीचे पितळ उघडे पाडणारे नाटक!**
लेखक : ख्वाजा अहमद अब्बास
अनुवाद : भारत सासणे

३० **चिंतन :**
**सक्तीने एकत्रीकरण करणारे लोक 'पागलखाने' निर्माण करतील!**
लेखक : कृष्ण चंदर
अनुवाद : भारत सासणे

३४ **मनोगत :**
**आपण आता 'भ्रमयुगात' प्रवेश केला आहे!**
लेखक : भारत सासणे

३८ **कथा :**
**जांभळाचे झाड**
लेखक : कृष्ण चंदर
अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ

संपादकीय

# अशी नाटके कालबाह्य व्हायला हवीत...!

साधना साप्ताहिकाचे संस्थापक साने गुरुजी यांचा ११ जून हा स्मृतिदिन. दर वर्षी त्या निमित्ताने एखादा विशेष अंक प्रकाशित केला जातो. अर्थात, गुरुजींना अगत्य होते असे विषय अनेक आहेत. मात्र त्यांना विशेष जिव्हाळा होता, असा एक विषय म्हणजे आंतरभारती. भारतीय संस्कृती ही अनेक लहान–मोठ्या संस्कृतींच्या घुसळणीतून व देवाण–घेवाण प्रक्रियेतून आकाराला आलेली आहे, अशी त्यांची धारणा होती. ती घुसळण व ती प्रक्रिया अधिक बळकट करायची असेल तर भाषा हे माध्यम सर्वांत महत्त्वाचे आहे, याबद्दल त्यांची खात्री झाली होती. किंबहुना, भाषा हीच संस्कृतीची वाहक असते असे ते मानत होते. म्हणून स्वातंत्र्यलढ्याच्या ऐन धामधुमीत अनेक आघाड्यांवर लढत असतानाही, भारतातील विविध भाषांमधील साहित्याचा परिचय मराठी वाचकांना व्हावा, यासाठी त्यांनी स्वतः अनेक भाषांतरे व रूपांतरे केली. स्वातंत्र्यानंतर ती प्रक्रिया अधिक गतिमान व्हावी, अशी त्यांची इच्छा होती. कारण आता आपल्याला नव्या व आधुनिक राष्ट्राची उभारणी करायची आहे, अशीच त्यांची भूमिका होती.

या वर्षीचा ११ जून हा त्यांचा ७० वा स्मृतिदिन आहे. मागील सात दशकांत यानिमित्ताने आंतरभारती या संकल्पनेवर साधनाने बरेच काही प्रसिद्ध केलेले आहे. प्रस्तुत अंक त्याच साखळीतील पुढची कडी आहे.

हा अंक आकाराला आला तो काहीसा अनपेक्षितपणेच. मागील अडीच महिने संपूर्ण भारत आणि जगातील अनेक देश कोरोना संकटामुळे लॉकडाऊनचा म्हणजे संपूर्ण टाळेबंदीचा अनुभव घेत आहेत. अत्यावश्यक म्हणावे असे चलन–वलन सोडले, तर एकूण जीवनव्यवहार थांबलेलाच आहे. जगाच्या ज्ञात इतिहासात असे पहिल्यांदाच घडले आहे. या पार्श्वभूमीवर दि.२ मेच्या अंकात 'बंद दरवाजाआड मनाची कवाडे उघडा!' या शीर्षकाचा संपादकीय लेख प्रसिद्ध केला होता. पण तशाच आशयाची मनोभूमिका त्या काळात अनेक लोकांच्या मनात उफाळून येत होती. त्यामुळे कदाचित त्यानंतर एकाच आठवड्याने भारत सासणे यांच्याकडून या अंकाचा प्रस्ताव आला.

भारत सासणे हे मराठीतील प्रथितयश लेखक आहेत, हे मराठी साहित्याचे वाचन असणाऱ्या सर्वांना चांगलेच ठावुक आहे. कथा, कादंबरी, नाटक, ललित लेखन, बालसाहित्य इत्यादी साहित्यप्रकार त्यांनी उत्तम प्रकारे हाताळले आहेत. साधना दिवाळी अंकांतून मागील दोन–अडीच दशके त्यांनी महत्त्वाचे लेखन केले आहे. त्या काळातील वसंत बापट, ग.प्र.प्रधान, डॉ.नरेंद्र दाभोलकर या संपादकांच्या मनातही सासणे यांच्या लेखनाविषयी ममत्व होते. त्यांची 'दोन मित्र' ही स्वतंत्र कादंबरी आणि 'दंतकथा' ही त्यांनी अनुवाद केलेली कादंबरी साधना दिवाळी अंकांतूनच प्रसिद्ध झाली होती. डॉ.दाभोलकर यांना फिक्शन या प्रकारातील साहित्यात कमी रुची होती आणि ते वाचण्यासाठी वेळही कमी मिळत असे. मात्र 'दोन मित्र' या कादंबरीचा गौरवपूर्ण उल्लेख ते अनौपचारिक संभाषणात अनेक वेळा करीत असत, इतकी

त्यांच्या मनाची पकड त्या कादंबरीने घेतली होती. दोन भिन्न जातींतील मित्र आणि आंतरजातीय विवाह, हा विषय त्या कादंबरीच्या मध्यवर्ती होता. 'दंतकथा' हा बिस्मिल्ला खान यांच्या हिंदी कादंबरीचा अनुवाद होता. त्यात एका कोंबड्याची आत्मकथा सांगितली गेली होती.

अशा या भारत सासणे यांच्याकडून असा प्रस्ताव आला की, 'कृष्ण चंदर या लेखकाचे 'दरवाजे खोल दो' हे १९६४ मध्ये प्रसिद्ध झालेले उर्दू नाटक त्यांनी अलीकडेच वाचले आहे आणि आजच्या या कठीण काळात ते इतके प्रस्तुत ठरते आहे की, त्याचा अनुवाद प्रसिद्ध करायला हवा. त्या नाटकाच्या पुस्तकात कृष्ण चंदर व ख्वाजा अहमद अब्बास या दोघांची चिंतने म्हणावीत असे दोन लेख आहेत आणि तेही अनुवाद करून नाटकासोबतच प्रसिद्ध करावेत असे आहेत.' हे सर्व प्रसिद्ध करायचे ठरले तर साधनाचा एक अंक लागणार, हे उघड होते.

अडचण अशी होती की, ते नाटक व ते दोन लेख उर्दू लिपीत असल्याने आणि प्रस्तुत संपादक उर्दू लिपीबाबत पूर्णतः अनभिज्ञ असल्याने निर्णय घेता येणे अवघड होते. शिवाय, ते लेखन इंग्रजी वा हिंदीत सध्या तरी उपलब्ध असलेले दिसत नाही आणि असेल तरी या लॉकडाऊन काळात मिळवता येणे अवघड होते.

पण निर्णय तर घ्यायचा होता. भारत सासणे यांच्या अभिरुचीचा व ते शिफारस करीत असलेल्या लेखनाच्या दर्जाविषयी प्रश्न नव्हताच. प्रश्न वेगळाच होता. साधना साप्ताहिकाचे वाचक विविध स्तरांतील व भिन्न अभिरुचीचे असल्याने आणि नाटक हे प्रामुख्याने ऐकले-पाहिले जाते, हे लक्षात घेता- असा अंक वाचनीय होईल का, असा तो प्रश्न होता. परंतु अतिशय गांभीर्याने लेखन करणारे सासणे अलीकडच्या चार-पाच वर्षांत उर्दू भाषा खूप चिकाटीने शिकताहेत, हे आम्हाला माहीत होते; शिवाय कृष्ण चंदर व ख्वाजा अहमद अब्बास या दोघांचे उर्दू व हिंदी साहित्यातील स्थान लक्षात घेता, हा अंक वाचनीय होणार असा अंदाज आम्ही बांधला आणि होकार दिला. त्यानंतरच्या तीन-चार आठवड्यांत सासणे यांनी ते तीन अनुवाद तर पूर्ण केलेच, पण हे सर्व का करावेसे वाटले हे सांगणारे समर्पक मनोगतही लिहिले. सर्व ऐवज अनुवाद होऊन हाती आल्यावर एकत्रित वाचला, तेव्हा आशय व विषय कमालीचा कालसुसंगत आहे याची तर खात्री पटलीच; पण अधिक आश्चर्य वाटले ते याचे की नाटक, दोन चिंतने व अनुवादकाचे मनोगत यातील विचार व धारणा कमालीची सुसंगत आहे. शिवाय, ते तीनही अनुवाद इतके प्रवाही झाले आहेत की, जर हे अनुवाद आहेत असे सांगितले नाही तर, हे लेखन मूळ मराठीच आहे, असे चांगल्या वाचकांनाही वाटू शकेल.

हे सर्व लेखन जुळवून अंक तयार केला तेव्हा लक्षात आले, चित्रे व अन्य सजावट यासाठी फार वाव नाही आणि ओढून-ताणून काही छायाचित्रे वा चित्रे देण्यात अर्थ नाही. त्यामुळे अंकात पाच पाने शिल्लक राहताहेत, त्यांचा वापर कसा करायचा याचा विचार करायचा होता. अर्थातच, अनेक चांगले पर्याय होते. पण सर्वोत्तम व औचित्यपूर्ण पर्याय निवडायचा होता. तेव्हा असा शोध लागला की, कृष्ण चंदर यांची 'जामून का पेड' ही कथा केंद्रीय शाळांच्या इयत्ता दहावीच्या पाठ्यपुस्तकात आहे आणि सहा महिन्यांपूर्वी शिक्षण खात्याकडून शाळांना असा आदेश देण्यात आलेला आहे की- २०२० व २१ या शैक्षणिक वर्षांत ती कथा विद्यार्थ्यांना शिकवण्यात येऊ नये, तिच्यावर परीक्षेत प्रश्न विचारले जाऊ नयेत. याचाच अर्थ, ती कथा अभ्यासक्रमातून वगळण्यात आलेली आहे. २०१५ पासून ती कथा पाठ्यपुस्तकात आहे आणि लक्षावधी प्रती छापून तयार असलेल्या पाठ्यपुस्तकातून ती काढता येत नाही, म्हणून हा आदेश आहे. म्हणजेच हे पाठ्यपुस्तक पुन्हा छापले जाईल, तेव्हा त्यात ही कथा नसेल.

शिक्षण खात्याने तो आदेश का काढला आहे याचे स्पष्टीकरण दिलेले नाही, कारणमीमांसा केलेली नाही. म्हणून ती कथा अनुवाद करून या अंकात घ्यावी आणि वाचकांना सादर करावी, असे ठरवले. ऐन वेळी निवडलेल्या या कथेचा अचूक व प्रवाही अनुवाद तत्परतेने करून देण्यासाठी चंद्रकांत भोंजाळ हेच नाव आमच्यासमोर प्रथमदर्शनी आले. (त्यांनी पन्नासहून अधिक हिंदी पुस्तकांचे उत्तम अनुवाद केलेले आहेत.) त्यांनी आमच्या विनंतीचा स्वीकार केला आणि चोवीस तासांच्या आत या कथेचा अनुवाद करून पाठवला.

असा हा अनपेक्षितपणे आकाराला येत गेलेला अंक कमालीचा वाचनीय झाला आहे, नेहमीच्या अंकांपेक्षा कमी वेळेत वाचून होईल असा झाला आहे.

या अंकाचा मूळ विषय 'मनाचे दरवाजे उघडा' हाच आहे. मानवी मनाला अनेक दरवाजे असतात आणि त्यातील काही पूर्णतः बंद केलेले असतात. या पूर्णतः बंद दरवाजांमुळे जीवनप्रवाह आटतो, त्याला साचलेपण येते. अशा साचलेपणामुळे मानवी संस्कृती अधिकाधिक उन्नत व उदात्त होण्याऐवजी लहान-मोठी डबकी तयार झालेले समाज आकाराला येतात. मग स्तरीकरण रंग-रूप धारण करते. कप्पे तयार होतात. अनेक समाजघटक त्या परिस्थितीचा गैरफायदा घेतात, काही घटकांची मक्तेदारी निर्माण होते. त्यातून अनेक अपप्रवृत्ती फोफावतात. अशा वेळी मार्ग काय राहतो? लोकांच्या मनाचे दरवाजे उघडण्यासाठी प्रयत्नशील राहावे लागते. त्यासाठी जोर-जबरदस्ती उपयोगाची ठरत नाही, आर्जव करावे लागते. समाजमनाची मशागत करावी लागते. त्यांचा प्रभाव मर्यादित असतो. म्हणून दीर्घकालीन वाटचाल अपरिहार्य बनते. पण हा दीर्घ काळ तरी किती असावा, याला काही मर्यादा?

'दरवाजे खोल दो' हे नाटक १९६४ मध्ये लिहिले गेले, त्या काळात त्याचे काही प्रयोगही झाले. त्यानंतर ६५ वर्षे उलटली. पण त्या नाटकात छोट्याशा कथानकातून आणि पाच-सहा प्रसंगांतून उपस्थित केलेले प्रश्न व ती समस्या आजही कायम राहावी का?

कमलकुंज नावाची मोठ्ठी इमारत, त्या इमारतीचा मालक पंडित रामदयाळ, त्याचा मुलगा कमलकांत आणि त्यांचा मुनीम मिर्झा हे या नाटकाच्या मध्यवर्ती आहेत. ते तिघे आणि त्यांच्याकडील सदनिकांमध्ये राहण्यासाठी येऊ इच्छिणारे भाडेकरू यांच्याभोवती हे नाटक फिरते आहे. जेमतेम अर्ध्या दिवसाचा कालखंड असणारे हे कथानक आहे. म्हटले तर साधे-सरळ, म्हटले तर बाळबोध. पण त्यातून उपस्थित केलेले प्रश्न व समस्या मात्र कमालीची गंभीर व दाहक!

वरवर पाहिले तर जात, धर्म, वंश इत्यादी कारणांमुळे घर भाड्याने मिळणे किती अवघड आहे ही समस्या दिसते. पण खरी समस्या ही दिसते आहे की, घर भाड्याने देणे-न-देणे यातून जात, धर्म, वंश यांच्याविषयीचा दुरभिमान खूप दाहक असू शकतो, समाजमनाची दारे-खिडक्या तो बंद ठेवू शकतो. यासंदर्भात ठळक म्हणावीत अशी उदाहरणे कितीही देता येतील. विसाव्या शतकाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान बडोदा संस्थानच्या सयाजीरावमहाराज करतात, पण त्याच डॉ.आंबेडकरांना बडोद्यात घर भाड्याने मिळवण्यासाठी अवहेलना सहन करावी लागली होती. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीचे उदाहरण द्यायचे तर प्रसिद्ध सिनेअभिनेत्री शबाना आझमी यांना मुंबईतील एका सोसायटीत घर विकत घ्यायचे होते, तेव्हा नकार आला होता. आजही बहुतांश लहान खेडेगावांत दलित वस्ती गावकुसाबाहेर असते. आणि मोठ्या शहरांमधील अनेक इमारतींमध्ये मुस्लिम कुटुंबांना सदनिका देण्यासाठी, जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन निव्वळ व्यावसायिक दृष्टिकोन असणारे मालकही नाखूष असतात. कारण काय, तर त्यामुळे इमारतीमधील अन्य सदनिकांचे भाव कमी होतात.

तर, अशा समस्या अधोरेखित करणारी नाटके कालसुसंगत ठरतात तेव्हा प्रश्न पडतो; त्या नाटककारांच्या द्रष्टेपणाचे कौतुक करायचे की, ती नाटके कालबाह्य ठरत नाहीत याबाबत खंत व्यक्त करायची...? 'दरवाजे खोल दो', या नाटकात कृष्ण चंदर यांनी पंडित रामदयाळ व कमलकांत या पिता-पुत्रांच्या संवादांमधून दोन पिढ्यांतील अंतर दाखवले आहे, नवी पिढी कशी बदलत आहे, हेही अधोरेखित केले आहे. ती समाधानाचीच बाब वाटते. पण नव्या पिढीतील गावोगावचे लहान-मोठे कमलकांतही जास्त बदलत नाहीत. ऐन उमेदीत ते आधुनिकतेची व बदलाची भाषा बोलतात खरे, पण आयुष्य पुढे सरकत जाते तसतशी त्यांच्यातील बदलांची गती मंदावते आणि काही वेळा तर ते आपापल्या पित्यांइतकेच- किंबहुना, अधिक कर्मठ होत असतात; अन्यथा अशी नाटके कालबाह्य झाली असती...!

असो. उघडा, दरवाजे उघडा...! हे अनुवादित नाटक वाचकांसमोर आणून, त्यानिमित्ताने एक संपूर्ण अंक काढून 'राष्ट्रीय एकात्मता' या जुन्याच विषयाकडे नव्याने लक्ष वेधता आले. असा योग गेल्या दहा वर्षांत तिसऱ्यांदा आला आहे. मे २०१० मध्ये 'दलपतसिंग येती गावा' आणि जानेवारी २०१३ मध्ये 'सत्यशोधक' या दोन नाटकांच्या निमित्ताने विशेषांक काढले होते. पहिल्यातून माहितीचा अधिकार देणारा कायदा आणि त्यानिमित्ताने ग्रामीण विकास या विषयावर प्रकाशझोत टाकला होता; दुसऱ्या नाटकातून महात्मा फुले यांच्या विचारकार्यावर दृष्टिक्षेप टाकून, सामाजिक सुधारणांचा किती प्रवास अद्याप बाकी आहे, हे अधोरेखित केलेले आहे. ती नाटकेही कालबाह्य व्हायला तयार नाहीत...!

नाट्यसंहिता

# उघडा, दरवाजे उघडा...!

**कृष्ण चंदर** । अनुवाद : भारत सासणे

(स्थळ : दिल्ली येथील कमलकुंज बिल्डिंगचा ग्राऊंडफ्लोअर. मालकाचं ऑफिस)
वेळ/ काळ : सद्य/ सकाळ
(ऑफिस दिसतं. भिंतींना नव्यानेच सफेदी केली आहे. विजेची तार खिडकीतून बाहेर जाताना दिसते. सूचित होतं की, बिल्डिंगमध्ये अजून वीज आलेली नाही. कोपऱ्यात लाकडी फळ्या, रंगांचे डबे आणि सिमेंटचं पोतं दिसतं. सूचित होतं आहे की, बिल्डिंग नव्याने तयार झाली आहे आणि अजून कामं बाकी आहेत. मध्यभागी गणेशाचं चित्र, मोठ्ठं असं. फुलांचे सुकलेले हार दिसतात. त्या खाली रिव्हॉल्व्हिंग चेअरवर पंडित रामदयाळ बसलेले दिसतात. समोर टेबल. टेबलावर फायली, फोन वगैरे. रामदयाळ यांच्या कपाळावर टिळा लावलेला आहे. डाव्या बाजूला एक रिकामी खुर्ची. छोटे टेबल, टाईपरायटर इत्यादी. तिथे टायपिस्ट बसलेला दिसतो. त्याचं नाव मिर्झा अर्शद. तो पान खातो आहे. एक पाटी, त्यावर तपशील. काही खुर्च्या इकडे-तिकडे. पडदा उघडतो तेव्हा पंडित पान खात आहेत, डब्यातून काढून. टायपिस्ट टाईप करता-करता थांबून, वेगळ्या डब्यातून पान काढतो आणि खातो. दोघांची ॲक्शन एकाच वेळेला होत राहते. त्यातून एक लय साध्य होते. समोर चपराशी उभा. पंडित त्याला पाहतात.)

पंडित : हो ऽ हो ऽ!... लगेच पाठवा आत. उशीर नको.. पाठवा... पाठवा.
(चपराशी जातो. पंडित टायपिस्टकडे पाहत)
...हांऽ, मिर्झाजी, किती फ्लॅट गेले?

मिर्झा : वीस!

पंडित : उरले किती?

मिर्झा : नऊ

पंडित : मला वाटतं, आज उरलेले पण जातील!... त्यांची ॲग्रिमेंट पण करायची असतील ना?

मिर्झा : तेच करतोय.



(एक पुरुष आणि एक स्त्री येते. पुरुष चाळीसच्या आसपासचा. स्त्री तीस–पस्तीस. पुरुषाने पाश्चिमात्य पद्धतीचा सूट घातलाय. स्त्रीने साडी परिधान केलीय. कपाळावर कुंकू. पुरुषाचा चेहरा गंभीर. दोघंही नीटनेटके, सुखवस्तू असे दिसताहेत.)

पुरुष : राम, राम.

पंडित : राम, राम! बसाऽ बसा ऽ...बसा ना!

पुरुष : पंडित रामदयाळ आपणच ना?

पंडित : हो ऽ!

पुरुष : या बिल्डिंगचे मालक आपणच?

पंडित : हो ऽऽ!

पुरुष : ही जाहिरात तुम्हीच दिलीत? (एक वृत्तपत्र देतो)

पंडित : हो, होऽ! आम्हीच दिली होती जाहिरात.

पुरुष : आम्हाला एक फ्लॅट पाहिजे होता.

पंडित : किती खोल्यांचा?

पुरुष : चार, चार खोल्यांचा फ्लॅट.

पंडित : चार खोल्यांचे फ्लॅट तर सगळे गेले.

पुरुष : गेले?

स्त्री : (निराशेने) हंऽऽ!

पुरुष : (स्त्रीला उद्देशून) तीन खोल्यांचा पण चालेल ना, सावित्री?

स्त्री : (सुस्कारून) हंऽ, काय करणार? ...चालेल, तीन खोल्यांचा घ्या.

पुरुष : (पंडितला उद्देशून) तर मग पंडितजी, आम्हाला तीन खोल्यांचा फ्लॅटच द्या. पण जरा लवकर व्यवस्था करा.

पंडित : आजच घ्या, महाराज! पण... आमच्या अटी तर तुम्हाला माहीत आहेत ना?

पुरुष : हो, होऽ! माहीत आहे ना! तीनशे रुपये भाडं आणिऽऽ (पेपर कटिंग पाहून) फर्निचर बाइंग इसेन्शियल! हे फर्निचर बाइंग काय आहे?

पंडित : अर्थ असा महाराज की, तुम्हाला फ्लॅट भाड्याने घेताना आमच्याकडून फर्निचरसुद्धा विकत घ्यावं लागेल.

स्त्री : फर्निचर तर आम्हाला विकत घ्यावंच लागणार आहे. मग बाहेरून घेणार नाही आम्ही, तुमच्याकडूनच घेऊ.

पुरुष : मग, कोणकोणतं फर्निचर घ्यावं लागेल?

पंडित : प्रत्येक खोलीत एक खिडकी, एक दरवाजा आणि एक स्टूल.

स्त्री : (गोंधळून) एक खिडकी, एक दरवाजा, एक स्टूल– प्रत्येक खोलीत?

पंडित : बरोबर, अगदी बरोबर.

स्त्री : म्हणजे तुम्ही खिडकी आणि दरवाजाला फर्निचर म्हणता? (पंडित फक्त मान हलवतो. संमतिदर्शक अशा अर्थाने)

पुरुष : तुला आश्चर्य वाटतंय सावित्री? जर घरांची कमतरता अशीच राहिली तर, एके दिवशी खोलीच्या चार भिंतीसुद्धा फर्निचरमध्ये समाविष्ट होतील!

स्त्री : अरे देवा ऽ!

पुरुष : बरं, तर पंडितजी– किती मधे पडेल फर्निचर आम्हाला?

पंडित : चार हजार रुपये.

स्त्री : काऽय? चार हजार रुपये? एक खिडकी, एक दरवाजा, एक स्टूल... चार हजार रुपये? म्हणजे कोणत्या वस्तूनी बनवलंय हे फर्निचर, म्हणते मी? चांदी, सोनं की वाघाचं कातडं?

पुरुष : सावित्री... हे फर्निचर माणसाच्या कातडीपासून बनवलं जातं! पण वाद करणं अगदीच व्यर्थ आहे.

पंडित : बरोबर! इकडं हाच नियम आहे.

पुरुष : ऐकलंस? ऐकलंस सावित्री? इकडला हाच नियम आहे. आता तुला घर पाहिजे असेल तर भाड्याचे तीनशे रुपये आणि फर्निचरचे चार हजार रुपये तुला वेगळे काढून ठेवावे लागतील. स्टूल... खिडकी आणि दरवाजा.

स्त्री : चार हजार रुपये– एका खिडकीचे! मेंदूतल्या सगळ्या खिडक्या उघडल्या आहेत जणू! पण उपाय काय आहे? घर तर पाहिजे ना, स्वत:ला लपवण्यासाठी?

दोन महिने झाले हॉटेलमध्ये राहतो आहोत.

पुरुष : मग टाईप करा ॲग्रीमेंट, पंडितजी!

पंडित : तुम्ही तीनशे रुपये भाडं द्याल?

पुरुष : देऊ.

पंडित : आणि चार हजार?

पुरुष : देऊ.

पंडित : आपलं तीन महिन्यांचं डिपॉझिट?

पुरुष : देऊ, तेही देऊ!

पंडित : आणि चालू महिन्याचं भाडंसुद्धा...

पुरुष : होऽ चालू महिन्याचं भाडंसुद्धा!!

पंडित : तर मग मिर्झाऽऽ
(मिर्झा दचकतो. दोघं एकाच वेळेवर पानं काढतात, एकाच वेळेस तोंडात ठेवतात. मिर्झा डबा बंद करतो.)
यांचं ॲग्रीमेंट टाईप करा.

मिर्झा : बेहतर है।

पंडित : तुमचं नाव?

पुरुष : अं? नाव? कृपाराम भारद्वाज... ही माझी धर्मपत्नी सावित्री.
(पंडित नमस्कार करतो.)

पंडित : राहणारे कुठले?

पुरुष : भोजपूर.

पंडित : (खूश होऊन) भोजपूर? तिथे तर माझे मामा राहतात- पंडित दीनदयाळ, मधी मोहल्लेवाले! तुम्ही ओळखता त्यांना?

पुरुष : त्यांना कोण ओळखत नाही?

पंडित : गोरे, बुटके-

पुरुष : गोरे, बुटके! कधी-कधी जोराने हसतात. हा...हा... हाऽ!
(मिर्झा जोरात हसतो. पंडितही हसतो. एक बोटाने दाखवत)

पंडित : तेच, तेच असणार... माझे मामा! मिर्झा यांचं ॲग्रीमेंट लगेचच टाईप कराऽ... फास्ट. (घुटमळत) विसरलोच विचारायचं... तुम्ही काय करता?

पुरुष : एका कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये सायंटिस्ट आहे मी. तिथे संशोधन करतोय. कॅन्सर म्हणजे समजलं का? नासूऽर... कर्करोग.

पंडित : भारद्वाजसाहेब, कर्करोग फार वाईट रोग असतो... त्यावर इलाज सापडला पाहिजे.

पुरुष : एक ना एक दिवस अवश्य सापडेल. माझ्यासारखे अनेक जण त्या प्रयत्नात आहेत. आमची नवी लॅबोरेटरी तयार झालीय. क्वार्टर्स पण तयार होताहेत आमच्यासाठी, पण अजून दोन-तीन वर्षं लागतील पूर्ण व्हायला.

पंडित : हरकत नाही... इथे राहाऽऽ! तीन वर्षं... तीस वर्षं! चालेल आम्हाला. हा... हा... हा! भारद्वाजजी, या घराला आपलंच घर समजा तुम्ही. आता तर तुमच्याशी आमचं नातं जुळलं ना! भोजपूरचे ना तुम्ही... मऽ गऽ... आमच्या मामाच्या गावचे तुम्ही!

पुरुष : धन्यवाद.

पंडित : पण एक वचन द्यावं लागेल...

पुरुष : कोणतं?

पंडित : दर महिन्याच्या पहिल्या तारखेला पूर्ण भाडं द्यावं लागेल.

पुरुष : हो, हो- वचन दिलं... अहोऽ
'रघुकुल रीत सदा चली आई ऽऽ
प्राण जाए ऽ पर वचन न जाएऽ'
(पंडित खूप खूश होतो. आनंदाने हात मिळवतो. त्याच वेळेला एक लहान मुलगा येतो, पुरुषाच्या पायाला मिठी मारतो. (रुसक्या आवाजात)

मुलगा : अब्बू... अब्बू... शकुरा आम्हाला आइस्क्रीम घेऊन देत नाही.

पंडित : (आश्चर्याने) अब्बू?

मुलगा : आणि अम्मी कुठाय?

पंडित : अम्मी?

मुलगा : अम्मी, शकुरा म्हणतोय की, ईदमध्ये आइस्क्रीम चालत नाही. पण अम्मी, ईद तर एक महिन्याने आहे ना?

पंडित : (आश्चर्याने) ईद?
(पाठोपाठ शकुरा येतो. हा नोकर आहे.

हा मुलाला पकडण्याचा प्रयत्न करतो. हा पकडा-पकडीचा खेळ अल्पकाळ चालतो. 'आई' रागाने नोकराला म्हणते)

स्त्री : तुला सांगितलं होतं ना मी- मुलाला आत येऊ द्यायचं नाही म्हणून...? लक्ष ठेवायला सांगितलं होतं ना?

शकुरा : बेगमसाहिबा, ऐकतच नाही तो. हात सोडून पळाला. फारच खोडकर झालाय...

स्त्री : सैतान कुठला! थांब, दाखवते तुलाऽ (मारायला धावते.) चल बाहेर, माझ्याबरोबर! तुला चांगलं आइस्क्रीम खायला देतेऽ (मुलाला पकडून बाहेर नेते. खोलीत शांतता.)

पंडित : तर, तुम्ही मुसलमान आहात? (पुरुष गप्प उभा राहतो.) आणि तुमची धर्मपत्नीसुद्धा? होऽ ना? (पुरुष गप्प उभा राहतो) ...म्हणजे तुम्ही दोघांनी मला खोटं सांगितलंत... वाऽ! काय ड्रामा केलात माझ्याशी. मी तर तुमच्यावर विश्वास ठेवला होता. खोटारडा, विश्वासघातकीऽ! (हे सगळं बोलणं चालू असताना पुरुष फेऱ्या मारत राहतो. मग थबकतो. गंभीर आवाजात बोलू लागतो. दरम्यान स्त्रीसुद्धा शांतपणे आत येऊन उभी राहते.)

पुरुष : हो, मी खोटं बोललो तुमच्याशी. माझं नाव कृपाराम भारद्वाज नाही, करीम उल्ला आहे. म्हणजे कृपारामच नाही का? मी भोजपूरचा राहणाराही नाही, फरिदाबादचा राहणारा आहे मी! माझ्या पत्नीचं नाव सावित्री नाही, साजदा आहे. म्हणजे त्याचा अर्थ तोच नाही का?...ती सावित्रीपेक्षा कमी नाही, पण आम्ही दोघांनी का खोटं सांगितलं असावं?

स्त्री : (पुढे येते. मंचावर मध्यभागी) तीन महिन्यांपूर्वी आम्ही कॅनडात होतो आणि हे कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये रिसर्च करीत होते. आम्ही पंडित जवाहरलाल नेहरू यांचं विधान वाचलं. त्यांनी म्हटलं होतं की, बाहेरच्या देशामधून काम करणारे आणि संशोधन करणारे जे हिंदुस्तानी सायंटिस्ट असतील, त्यांनी आपल्या देशात परत यावं- इथे योगदान द्यावं, इथे काम करावं... या देशाच्या प्रगतीच्या कामात हातभार लावावा. या अपिलाचा इतका परिणाम झाला आमच्यावर की, आम्ही इथं आहोत तुमच्यासमोर! कॅनडात पगार खूप होता, इथे कमी आहे; पण हो, आम्ही आमच्या देशात आहोत! कॅनडात हे 'हेड ऑफ दी डिपार्टमेंट' होते, इथे त्यांचा दर्जा कमीच आहे त्यामानाने. कॅनडात आमच्याकडे सहा खोल्यांचं घर होतं, इथे आम्ही हॉटेलात राहतो आहोत. पण तुम्हाला सांगते- मी समजावलं मनाला. म्हटलं की- हरकत नाही, जे लोक आपल्या देशावर प्रेम करतात, ते पैसे आणि पोझिशनवर प्रेम करीत नसतात...

करीम उल्ला : पण मी हॉटेलात कायम राहू शकत नाही. मला घर पाहिजे. सुख आणि समाधान पाहिजे. मला बायको आणि दोन मुलं आहेत. आम्हाला घर पाहिजे, म्हणून आम्ही घराच्या शोधात होतो. आणि या शहरात घरं शिल्लक नाहीत, असंही नाही. या तुमच्या कमल-कुंजमध्ये फ्लॅट रिकामा आहे. शेजारच्या इमारतीत रिकामा आहे. रस्त्याच्या पलीकडच्या बिल्डिंगमध्ये रिकामा आहे. आणि असंही नाही की, माझ्याकडे पैसे नाहीत. मी तीनशे रुपये भाडं देऊ शकतो. तीन महिन्यांचं डिपॉझिटही देऊ शकतो. चालू महिन्याचं भाडं पण देऊ शकतो आणि एक खिडकी, एक दरवाजा अन् एका स्टूलसाठी चार हजार पण देऊ शकतो. (पुढे येऊन वेदनेने) पण तरीही, मला घर मिळत नाही! तीन महिन्यांपासून प्रयत्न

करतो आहे, पण घर मिळत नाही. घरं रिकामी आहेत... जाहिराती प्रकाशित होत आहेत; पण मी जेव्हा बिल्डिंगमध्ये जातो, चौकशी करतो, तेव्हाही घरं रिकामीच असतात. पैसे देण्याची चर्चा होते, तेव्हाही घरं रिकामीच असतात. ॲग्रीमेंट टाईप करताना नाव सांगावं लागतं, तेव्हा मात्र घरं रिकामी नसतात! ती अचानक नाहीशी होतात... खिडकी, दरवाजा आणि स्टूलसहित! (उपहासाने) आता ही घरं रिकामी नाहीत, उपलब्ध नाहीत. अहोऽ ती तर कालच दिली गेली नाऽ! भोजपूरच्या मामासाठी ठेवलाय फ्लॅट. मुलाच्या लग्नासाठी ठेवलाय फ्लॅट... अमुकसाठी-तमुकसाठी. हो, कालपर्यंत रिकामा होता, आता नाही! माझं नाव कृपाराम नाही, करीम उल्ला आहे... माझ्या बायकोचं नाव सावित्री नाही, साज़दा आहे- म्हणून फ्लॅट रिकामा नसतो... इथेही मिळणार नाही.

साज़दा : चार हजार मैलांचा प्रवास करून आम्ही जेव्हा स्वत:च्या देशात आलो, तेव्हा आमच्या मनात नवे इरादे, नव्या इच्छा उमलल्या होत्या. नवी उमेद आणि नवे अंकुर मनात निर्माण झाले होते. आम्ही नव्या उत्साहाने आलो होतो आपल्या देशात. (नवऱ्याकडे पाहून) यांनी कॅन्सरवर इलाज शोधला, तर फक्त मुसलमानांनाच फायदा होणार आहे का? हिंदुस्थानाला जडलेला कर्करोग दूर होणार आहे... हिंदू, ख्रिश्चन, शीख आणि पारशी... सर्वांचा रोग बरा होईल! ज्ञान आणि विज्ञान हे जातपात, धर्म, वंश- सर्वांपलीकडे पाहत असतं. मानवतेच्या दृष्टीने उपयोग असतो या ज्ञानाचा. असं असेल तर ईश्वराने निर्माण केलेल्या या पृथ्वीवर हा भेदभाव का?

करीम : पंडित रामदयाळ, किती शरमेची गोष्ट आहे ना ही? छत मिळविण्यासाठी माणसाला नाव, धर्म, संस्कृती बदलावी लागते! त्याला मजबूर करण्यात येतं, यापेक्षा भयानक गोष्ट कोणती? बघा, मी अखेर तुमचा भाऊच आहे ना? या अस्तित्वाने मला आणि तुम्हालाही बनवलंय ना? या देशात माझी मुळं आहेत, हा माझा देश आहे. मी इथे राहू इच्छितो. इथे राहून मला माझ्या देशाची सेवा करायचीय. पण मला घर मिळत नाही. मग मी जायचं तर कुठं जायचं? सांगाऽ

पंडित : (रागावून) मी काय सांगू? जाऽ कुठेही जा! उर्दू बाजारमध्ये जा, जामा मशिदीच्या चौकात जा, खुदाबक्शच्या वस्तीत जा... पुष्कळ ठिकाणं आहेत तुमच्यासाठी... इथेच माझ्या डोंबल्यावर बसण्याची गरज आहे का? (धुसमुसत) मेंदूचं पार खोबरं करून टाकलं. टाळकं उठवलं... जा, इथे फ्लॅट रिकामा नाही. (हाताने त्यांना जायची खूण करतो. टेबलाच्या खणातून तेलाची बाटली काढतो. तेल हातावर ओतून डोक्याला मालिश करायला लागतो आणि डोळे मिटून बसून राहतो. करीम उल्ला आणि साज़दा निराश होऊन हळूहळू निघून जातात. त्याच वेळेला पंडित दीनदयाळचा मुलगा कमलकांत आत येतो आणि खुर्चीवर बसतो. हा तरुण, आधुनिक असा. याने करीम उल्लाचे बोलणे ऐकलंय. करीम उल्ला निघून गेल्यानंतर हा आपल्या वडिलांशी बोलायला लागतो.)

कमलकांत : बाबाऽ बाबाऽ!

पंडित : (डोळे उघडून) आलास? सिनेमा पाहिलास? त्याशिवाय काही काम सुचत नाही का?

कमलकांत : (हसून) ज्याच्या वडिलांकडे आठ इमारती असतील, त्याने काय काम करायचं?

पंडित : यासाठी तुला विलायतेला पाठवलं होतं?

कमलकांत : मी बॅरिस्टर कसा झालो, कुणास ठाऊक? तिथंही मी काही काम करायचो नाही... पण ते जाऊ द्या बाबा, माझे तुमच्याकडे जरा जरुरीचं काम आहे.

पंडित : सगळे शिल्लक फ्लॅट भाड्याने दिल्याशिवाय कोणतंही काम होणार नाही दुसरं...

कमलकांत : पण आत्ताच एक सभ्य गृहस्थ इथून गेले ना? त्यांना का दिला नाही फ्लॅट?

पंडित : म्हणजे काय? मी मुसलमानाला का बरं देईन फ्लॅट? (मिर्झा खोकतो. पंडित चमकतो. थोडं वरमतो. गडबडीने-) म्हणजे मला असं म्हणायचं आहे की, मी काही मुसलमानांचा द्वेष करत नाही... माझे किती तरी मित्र मुसलमान आहेत. आता मिर्झांचंच उदाहरण घ्या! दहा वर्षांपासून मुनीम आहेत इथं, माझ्याकडे. तुम्हाला कधी त्रास झालाय माझ्याकडून?

मिर्झा : कधीच नाही.

पंडित : कधी आम्ही भांडलो तुमच्याशी?

मिर्झा : कधीच नाही.

पंडित : मी तर मुसलमानांचा मोठा हितचिंतक आहे. पण घराची गोष्ट वेगळी! ही हिंदूंची वसाहत आहे. इथली गोष्टच निराळी. इथल्या लोकांचे स्वभाव, राहणीमान वेगळं आहे. काळजी घ्यावी लागते. नाही तर मोठी गडबड होऊन जाते. तू अजून बच्चा आहेस कमलकांत. तू समजू शकणार नाहीस या गोष्टी. या मिर्झांनाच विचार ना... ते खुदाबक्ष मोहल्यात राहतात. विचार त्यांना- त्या मोहल्ल्यात कोणी हिंदू राहतं का, विचार.

मिर्झा : (नकारार्थक मान हलवत) नाही! खुदाच्या मेहेरबानीने त्या वस्तीत अजून कोणी काफिर... अंऽ म्हणजे मला म्हणायचंय कीऽऽ कोणी हिंदू राहत नाही तिथे! (गडबडीने पानाचा डबा उघडतो. पंडितला देतो.) घ्या... पान घ्या! (त्याच वेळेस एक पेशावरी हिंदू पठाण आपल्या बायकोसह आणि 'लच्छू' नावाच्या दलालासह प्रवेश करतो. पठाणाचा पठाणी वेश, त्यावर कोट घातलाय. टाय पण घातलाय. पेशावरी चप्पल. बोटांत अंगठ्या इत्यादी. श्रीमंती दिसते आहे. बायको आणि पठाण आपापसात बोलत येतात. कोणाकडेही न पाहता येऊन बसतात. एकमेकांसमोर खुर्च्यांवर बोलत राहतात.)

लाल

आफताब राय: (बायकोला) एक नक्की- फ्लॅट चांगला आहे, बालूऽ

बायको : कपडे धुवायला मोठी जागा नाही.

राय : ते जाऊ दे- हॉल पाहिला? किती मोठा आहे! त्यात तर नाच-गाणी पण होतील.

बायको : नाच-गाणी? आधी घर तर घ्या!

राय : ठीक आहे... अरे लच्छू, घराबद्दल जरा बोलणी सुरू कर. (पंडितकडे वळून) अरे, जरा मालकाला बोलाव.

लच्छू : (घाबरून) अहो, हेच मालक आहेत. यांची आठ दुकानं आहेत. (पठाण जोरात हातमिळवणी करतो. पंडितला बाजूला घेऊन लच्छू म्हणतो-)

लच्छू : सगळ्यात वरचा फ्लॅट पसंत आहे त्यांना. पठाण बारा हजार पागडीही देईल आणि बाराशे रुपये भाडंसुद्धा. सात खोल्या आहेत ना, म्हणून! लवकर ॲग्रीमेंट करा शेठजी... माझं पण दोन महिन्यांचं कमिशन राहिलंय.

पंडित : पण हे शेठ आहेत तरी कोण?

लच्छू : खूप मोठे शेठ आहेत. रेस्टॉरंट आहे आणि काय काय...

पंडित : हिंदू आहेत ना?

लच्छू : होऽ होऽ! हिंदू आहेत. मी कसा आणीन इतरांना तुमच्याकडे? (इकडे पठाण आणि बायको यांचं संभाषण सुरूच आहे.)

पंडित : महाशय, तुमचं नाव?

राय : मला महाशय म्हणू नका. आमच्या

पेशावरला एक महाशय होता, पण तो पिशव्या विकायचा...

पंडित : (लच्छूला) नाव विचारलं तर इतका राग?

लच्छू : (पठाणाला) तुमचं नाव विचारतायत...

राय : आमचं नाव आफताब राय आहे. ही माझी पत्नी. यांचं नाव इकबाल बाई असं आहे. विचारा, अजून विचारा काय विचारायचं असेल ते.

पंडित : आफताब... इकबाल? हिंदू आहात ना?

राय : हो, होऽ भाया! डोक्यापासून पायापर्यंत हिंदू आहोत आम्ही! आणि आत्ता नाही काही... सात पिढ्यांपासून हिंदू आहोत.

पंडित : पण ड्रेस तर पठाणी आहे तुमचा?

राय : मग, पठाण आहोत आम्ही. पेशावरला सगळेच हाच पोशाख वापरतात. हिंदू असो, नाही तर मुसलमान. पण आम्ही हिंदू आहोत. तुमचा फ्लॅट घेतल्यानंतर त्यात एका खोलीत देवघर असेल.

पंडित : (आनंदाने) खरंच? वाऽ वाऽऽ! मिर्झाजी, आजकाल असे धार्मिक भाडेकरू कुठे मिळणार? लगेच त्यांचं ॲग्रीमेंट टाईप करा.

मिर्झा : जी हुजूर.

राय : कितीचा चेक लिहू?

पंडित : कोणता फ्लॅट घ्यायचाय?

राय : सात खोल्यांचा, वरच्या मजल्यावरचा.

पंडित : पण तुम्ही तर मियाँ-बिबीच आहात ना? मग सात खोल्या कशाला?

राय : शाब्बास! तुम्हाला कोणी सांगितलं? खरं तर मला तीन बायका आहेत आणि सात मुलं आहेत.

पंडित : (घाबरून) तीन बायका? हे राऽम!

लच्छू : (घाईघाईने) तीन बायका त्यांच्या आहेत. ते सांभाळतील ना, तुम्ही का घाबरताय?

पंडित : बरं... तर ठीक आहे. (पठाणाकडे वळून) बरं, तुम्ही मांस-मच्छी तर खात नाही ना?

राय : कोण म्हणतं नाही खात म्हणून? मांस, मच्छी, मुर्गी- सगळं खातो आम्ही. आम्ही तुमच्यासारखं नरक भोगायला या जगात आलेलो नाही! रात्री तंदुरी मुर्ग संपवत नाही, तोपर्यंत झोपसुद्धा येत नाही आणि सोबत व्हिस्की पाहिजेच...

पंडित : म्हणजे दारू पण पिताऽऽ?

राय : होऽऽ! कव्वाली किंवा बाईच्या नाचाचे कार्यक्रम पण करतो घरी...

पंडित : हे राऽम! मी हे काय ऐकतोय? लच्छूऽऽ यांना इथून बिल्डिंगच्या बाहेर घेऊन जा, नसता हार्टफेल होईल माझा. अरे देवाऽ, डोकं गरगरायला लागलं.

(लच्छू पठाणाच्या कानात काही सांगतो.)

लच्छू : चला शेठजी... घर तर आधीच गेलं आहे. दुसऱ्याला दिलं आहे.

राय : आत्ता दिलं? आम्ही तर हेच घर घेणार.

इकबाल : चला होऽ! कपडे धुवायला जागा नव्हती, नाही तरी.

राय : चलाऽ जाऊ या... पण घर चांगलं होतं.

(लच्छूसह दोघेही जातात.)

कमलकांत : तुम्ही पण कमाल करता बाबा... असे गिऱ्हाईक दररोज येतात का? बारा हजार पागडी आणि बाराशे रुपये भाडं... असे शेठजी रोज-रोज मिळणार नाहीत.

पंडित : पण तू ऐकलंस ना? तो मांस-मच्छी सगळं खातो.

कमलकांत : परदेशात सगळे खातात.

पंडित : मग मी परदेशी माणसाला ठेवणार नाही.

कमलकांत : सगळे काश्मिरी खातात.

पंडित : मग मी काश्मिरीला माझ्या बिल्डिंगमध्ये ठेवणार नाही.

कमलकांत : बंगाली लोक रोज मच्छी खातात.

पंडित : मग मी बंगाल्याला पण इथे घुसू देणार नाही.

कमलकांत : मासळी तर मद्रासी पण खातात, मल्याळी खातात.

पंडित : तर मग मी मद्रासी आणि मल्याळी यांना पण घर देणार नाही.

कमलकांत : आणि पंजाबी लोकसुद्धा मटण खातात.

पंडित : मग मी पंजाब्यांना पण घर देणार नाही. (तेवढ्यात पगडी घातलेला सरदारजी येतो. हा सुतार आहे. हातात हत्यारं) काय झालं सरदारजी?

सरदार : अकरा आणि बारा नंबरच्या फ्लॅटचे दरवाजे व खिडक्या तयार झाल्यात.

मिर्झा : एक दिवस आधीच काम पूर्ण केलंत तुम्ही. वाऽ!

सरदार : काम करायचं असेल तर एक दिवस आधी काय आणि नंतर काय! पण ते जाऊ दे... लाकूड संपलंय. अलमारी आणि वॉर्डरोबसाठीसुद्धा लकडी लागेल आताऽ

पंडित : आता सरदार गुरुदयालसिंगला फोन लावतो.

सरदार : लवकर मागवा लाकूड. मी बसलोय नुसता.

(सरदार सुतार निघून जातो आणि मागोमाग दोन मल्याळी मजूर येतात. काही न बोलता कोपऱ्यातले रंगांचे डबे घेऊन निघून जातात. पंडित आणि मिर्झा पान खातात.)

मिर्झा : हा सरदारजी किती कामसू आणि हुशार सुतार आहे, नाही?

पंडित : अगदी एक नंबरी! अच्छा आणि सच्चा! लाकडाचा तुकडा पण इकडचा तिकडे होत नाही. अगदी प्रामाणिक...

मिर्झा : हे मल्याळी मजूऽर...

पंडित : ते पण चांगले मिळालेत आपल्याला. दिवस-रात्र कामात गुंग असतात!

मिर्झा : हेही मेहनती असतात.

(दोघं पान खातात.)

पंडित : विजेचं काय? बिजली येणार की नाही? बिल्डिंगमध्ये अजून वीज आली नाहीये- तो इन्स्पेक्टर तुमचा मित्र आहे.

मिर्झा : कोण? गुप्ता?

पंडित : नाही... तो पोरगेलासा जवान. काय नाव त्याचं?

मिर्झा : अंऽऽ डिसुझा?

पंडित : हां... तोच. डिसुझा. त्याच्याकडे फाईल घेऊन जा तुम्ही.

मिर्झा : (बाहेर पाहत) ऊन खूप आहे म्हणा...

पंडित : जवळ तर आहे. पायी जाल तर दहा मिनिटांत पोहोचाल. जा ऽ तर मग... (मिर्झा उठू लाग तो, तेवढ्यात सिल्कचा पायजमा-कुर्ता घातलेला माणूस येतो. मिर्झाला पाहून ओळखतो. उत्साहाने-)

माणूस : अच्छन मियाँ! (हात मिळवतो.)

मिर्झा : अरेऽ मुन्नू मियाँ... तुम्ही इथे कसे? तुम्ही तर लखनौला होता ना?

माणूस (मुन्नू): लखनौत होतो, पण आता दिल्लीला आलो आहे.

मिर्झा : इथे?

मुन्नू : आपल्या धंद्याची ब्रँच काढायचीय चांदणी चौकात. चाळीस हजार पागडी देऊन एक दुकान मिळवलंय.

मिर्झा : म्हणजे आता दिल्लीत राहणार?

मुन्नू : इन्शा अल्ला!

मिर्झा : घरी सगळं ठीक? मिसेस आणि मुलगा?

मुन्नू : तो आता दहा वर्षांचा झालाय. देवाची कृपा! काही वर्षांत दुकानावर पण बसेल.

मिर्झा : मी ऐकलं होतं की, तुम्ही मुंबईला जाणार होतात. फिल्म कंपनी उघडण्याचा पण विचार होता म्हणे!

मुन्नू : असा काही विचार नाही. सात पिढ्या झाल्या, चौकात आम्ही तंबाखू विकतो... तेच करणार आहोत.

मिर्झा : मग?

मुन्नू : राहण्यासाठी घर नको? फ्लॅट पाहिजे. इथे रिकामा आहे म्हणे. मिळवून द्या.

मिर्झा : हे आमचे मालक. कमलकुंज बिल्डिंगचे मालक. मालक, हे आमचे बालमित्र... मनसुख नाव आहे यांचं. यांना एक फ्लॅट जरूर द्यावा.

पंडित : पण... पण हे तर उर्दू बोलतायत.

मिर्झा : (भोळेपणाने) मग काय झालं? उर्दू तर मीही बोलतो!

पंडित : तुम्ही बोलता... हेही बोलतात, म्हणून तऽर...
मिर्झा : म्हणून तर काय?
पंडित : आता तुम्हाला तर सगळं माहीत आहे. आपण इथे कोणाला फ्लॅट देत असतो, हे सांगायला का पाहिजे? हे तर... हे तर मुन्नू मियाँ आहेत.
(मियाँ शब्दावर जोर देतात)
मिर्झा : समजलं. पण शेटजी, यांचं खरं नाव महेश आहे. आम्ही त्यांना बालपणापासून मुन्नू म्हणतो! माथूर यांचं आडनाव. हे हिंदू आहेत.. हिंदूऽऽ
पंडित : (संशयाने) पण बोलतात उर्दू?
कमलकांत : मग काय झालं? उर्दू बोलणं हिंदूसाठी गुन्हा आहे का? बाबाऽ अहो, लाखो हिंदू या देशात उर्दू बोलतात, लिहितात... हीच त्यांची संस्कृती! उर्दू शायरीवर लाखो लोक बेहद्द खूश असतात.
मुन्नू : काय करणार साहेब? आमच्या लखनौची संस्कृतीच अशी! आठशे वर्षांतच त्यांचे शब्द आमच्या जिभेवर आले. सहवासाचा परिणाम. आणि आमचेही शब्द त्यांच्या जिभेवर चढले, हाही परिणाम. मेल-जोल म्हणतात ना त्याला... यात वाईट काय?
पंडित : पण हे खुदाचं नाव घेतात... मी ऐकलंय ना! ते इन्शाल्ला म्हणाले मघाऽ! मला फसवू नका तुम्ही... सकाळी तो अनुभव आला अन् आता...
मुन्नू : जरूर ऐकलं असेल. मी खुदाची शपथ घेतो... आणि देवाची... म्हणजे हिंदू देवाची पण घेतो. दोन्ही मला प्रिय आहेत. पण मी शपथेवर सांगतो की, मी हिंदूच आहे. खुदा की कसम...
(पंडित आश्चर्याने आणि शंकेने पाहताहेत)
मिर्झा : माझ्यावर विश्वास ठेवा, मी याच्या खानदानाला ओळखतो.
मुन्नू : चीफ कमिशनरचं पत्र आणू का, माझ्या फोटोसहित? म्हणजे ओळखपत्र?
पंडित : नाही, त्याची गरज नाही. तुम्ही म्हणताय आणि मिर्झा सांगतायत म्हणून मी विश्वास ठेवतो आणि तुम्हाला फ्लॅट देण्याचा निर्णय घेतो. पण...
(इकडे दोघांचं आनंदाने हात मिळवणं वगैरे सुरू आहे. ते एकदम थबकतात.)
मुन्नू : पण?
पंडित : माझ्या काही अटी आहेत.
मुन्नू : जाहिरातीत त्या दिल्याच आहेत. दरवाजा... खिडकी... स्टूल... आणखी कोणत्या?
पंडित : मटण घरात येणार नाही.
मुन्नू : मी स्वत: रक्तमांसाचा पिंड आहे. मीच घरात यायचं नाही का?
पंडित : तसं नाही, आहाराचं म्हणतो आहे मी! मटण आणायचं नाही... पकवायचं नाही.
मुन्नू : ठीक आहे. नाही पकवणार... बाहेरून मागवू?
पंडित : बाहेरून पण आणता येणार नाही.
(मुन्नू मिर्झाच्या हातातून हात सोडवू पाहतो, पण मिर्झा त्याला थांबवतो. खूण करतो.)
पंडित : ठीक... ठीक! बाहेरून पण नाही आणणार.
पंडित : आणि मच्छी पण नाही.
(मिर्झा खूण करतो.)
मुन्नू : ठीक. मच्छी पण पकणार नाही. ठीक?
पंडित : अंडी पण नाही.
मुन्नू : ठीक.
पंडित : लसूण आणि कांदा पण चालणार नाही.
मुन्नू : अहो, गोळी मारा त्यांना! आम्ही नाही खाणार.
पंडित : घरात कव्वाली होणार नाही.
मुन्नू : कव्वाली? नाही... नाही... होणार नाही.
पंडित : मुजरा.
मुन्नू : नाही होणार!
पंडित : व्यभिचार होणार नाही. वाईट... दुराचार पण नाही.
मुन्नू : मी आचार पण खायचं नाही?

पंडित : तसं नाही... तसं नाही. वाईट काम होणार नाही.

मुन्नू : मग तुम्हाला पण माझ्याकडून चार हजार पागडी घेता येणार नाही... तीन महिन्यांचं डिपॉझिट पण घेता येणार नाही... तीनशे रुपये भाडं पण तुम्हाला घेता येणार नाही. दोन महिन्यांची दलाली पण देता येणार नाही. हे सगळे लुटण्याचे धंदे आहेत.

पंडित : (रागाने) मी लुटण्याचे धंदे करतो?

मुन्नू : होऽ आणि ब्लॅकमार्केटिंग पण... वाईट काम होणार नाही म्हणालात, मग हे चांगले काम आहे का?

पंडित : ब्लॅक? उफ्...

मुन्नू : तुम्ही स्वत: दुराचारी आहात. जर मुजरा आणि कव्वाली ऐकणं, लसूण आणि कांदा खाणं, मांस खाणं हे दुराचाराचं लक्षण आहे; तर चार हजार पागडी, दोनशे रुपये महिना भाडं- हे काय? प्रत्यक्षात ते साठ रुपयांवर असू नये नियमाप्रमाणे... झालंच तर दोन महिन्यांची दलाली तुमच्या लच्छूला का द्यायची? झालंच तर ॲडव्हान्स पण द्यायचा? हे सगळं दुराचाराचं लक्षण नाही?

पंडित : उफ्... उफ्... माझं औषध... माझ्या हृदयविकाराचं औषध...
(अस्वस्थ. कमलकांत चटकन उठून ड्रॉवर शोधतो. गोळ्यांची बाटली काढतो. गोळी देतो. पाणी देतो. पंडित बसकण मारून खुर्चीवर बसतात. गोळी घेतात. सगळे त्यांच्याकडे पाहताहेत, भोवती गोळा होतात. पंडितना बरं वाटतं आहे. ते मानेने आणि हाताच्या इशाऱ्याने सांगतात.)

कमलकांत : बरंय आता?

पंडित : हंऽऽ!

कमलकांत : स्वस्थ बसा जरा... बोलू नकाऽ

मिर्झा : बिचारे! ब्लडप्रेशरचा आजार आहे यांना. तुम्ही आता काही बोलू नका. मीच वेळ-प्रसंग पाहून, मूड पाहून त्यांच्याशी बोलेन.

मुन्नू : नाही... मिर्झाजी, तुम्ही त्रास घेऊ नका माझ्यासाठी. मलाच इथे घर घ्यायचं नाही... मलाच इथे राहायचं नाही... हे करू नका, ते करू नका, हे खाऊ नका... यांच्या ढोंगबाजीबद्दल... हिप्पोक्रसीबद्दल बोललंच पाहिजे. आणि आम्हाला असं सांगणारे हे असतात तरी कोण?

मिर्झा : जरा शांत...

मुन्नू : (हात मिळवतो) मी जातो. पुन्हा भेटू. (बाहेर निघून जातो.)

पंडित : आज काही चांगला दिवस दिसत नाही. कोणी योग्य गिऱ्हाईक येतच नाही वाटतंऽऽ
(कपाळाला हात लावून बसतो. थोडा वेळ शांतता.)

कमलकांत : (हळू आवाजात) बाबाऽ, तुम्ही पण कमाल करता! या बिल्डिंगमध्ये अखेर तुम्हाला ठेवायचंय तरी कोणाला? लसूण आणि कांदा नको, मांस-मच्छी नको. कव्वाली ऐकणारा तुम्हाला पसंत नाही, उर्दू बोलणारा तुम्हाला पसंत नाही! पंजाबी, बंगाली तुम्हाला नको, मल्याळी नको... मग या घरात राहणार कोण? अर्धा हिंदुस्तान तर बहिष्कृत केलाय तुम्ही...

पंडित : कमलकुंज बिल्डिंगमध्ये फक्त मर्यादावादीच राहतील. ज्यांना आपल्या प्राचीन संस्कृतीचा आणि संस्कारांचा अभिमान आहे, तेच राहतील!

कमलकांत : अभिमान तर मलाही आहे.. आणि या देशात राहणाऱ्या सगळ्यांनाच आहे. पण हा काळ विक्रमादित्य आणि सम्राट हर्षचा आहे का? आता आधुनिक युग सुरू झालं आहे. काळानुसार सभ्यता आणि संस्कृती दोन्ही बदलत असतात. या देशात निग्रोही आले, द्रविडही आले, आर्यही आले. मग मंगोल आले, मग

मुसलमान आले... इंग्रज आले. आता ॲटमबॉम्ब यायचाय! इतकी संमिश्रता असताना, एक धर्म सर्वांसाठी लागू करता येणार नाही तुम्हाला!

पंडित : पण इथे, या बिल्डिंगमध्ये जे मी ठरवेन, तेच चालेल. जसं आजपर्यंत जुन्या बिल्डिंगमध्ये होत आलं, तसं.

कमलकांत : पण ही नवी इमारत आहे... नव्यानं बनली आहे.

(याच वेळेस दोन मद्रासी येतात. एकाचं नाव बिल्लू आहे, तर दुसऱ्याचं नाव रंगाचारी)

बिल्लू : अवाऽई यों यों! अंदा बिल्डिंग नरम बम नालाता ने!

(ही बिल्डिंग खूप चांगली आहे.)

पंडित : (रंगाचारीला) हे काय बोलताहेत?

रंगाचारी : अमाऽ राऽ शेठ बोलता है कि... तुमची बिल्डिंग खूप चांगली आहे.

बिल्लू : ये हिंदू होता?

रंगाचारी : हां ऽ हां ऽ!

बिल्लू : अंगल मोटा चाबडा?

पंडित : ये मोटा अंगल... काय बोलतात हे?

रंगाचारी : आमचे शेठ विचारतायत की, तुम्ही अंडी तर खात नाहीत ना?

पंडित : राऽम रा ऽ म!

रंगाचारी : नाही खात.

बिल्लू : आगे पूछोऽ

रंगाचारी : मांस-मच्छी?

पंडित : छे... छे... नाही, कधीच नाही.

रंगाचारी : लसूण-कांदा?

पंडित : नाही हो, कधीच नाही. (रागाने) पण हे विचारणारे तुम्ही कोण? (कमलकांत इथे सूचक हसतो. रंगाचारी बिल्लूला 'इल्ले इल्ले' असं म्हणतो.)

पंडित : तुम्ही मला इल्ले-इल्ले म्हणता? भाडेकरू आहात तुम्ही! मी या बिल्डिंगचा मालक आहे... प्रोप्रायटर! समजलं?

रंगाचारी : मला माहीत आहे! आमच्या शेठची खात्री करायची आहे ना- त्यांना हिंदू बिल्डिंगवालाच पाहिजे!

(पंडित मान हलवतो)

...हे धर्म-कर्मवाले शेठजी आहेत. तिकडे त्यांच्या गावात त्यांनी तीन लाख खर्च करून मंदिर बनवलं आहे.

पंडित : (नमस्कार करून) जय रामजी कीऽऽ!

बिल्लू : (हात जोडून ) नमस्कारम्!

पंडित : तुम्ही काय करता?

रंगाचारी : म्हणजे? तुम्ही आमच्या शेठला ओळखलं नाही? त्यांचं कलकत्त्याला मद्रासी हॉटेल आहे. नागपूरला मद्रासी हॉटेल आहे... लखनौला मद्रासी हॉटेल आहे. पटणा आणि दिल्लीतसुद्धा हॉटेलं आहेत.

मिर्झा : आणि मद्रासमध्ये पण मद्रासी हॉटेल आहे का?

रंगाचारी : काय? मद्रासमध्ये मद्रासी हॉटेलची गरजच काय? मद्रासबाहेर आमची पंधरा हॉटेल्स आहेत.

पंडित : (आनंदाने) जय रामजी की!

बिल्लू : नमस्कारम्!

पंडित : कोणता फ्लॅट पाहिजे तुम्हाला?

बिल्लू : अमकोऽ सब फ्लॅट मंगता है...

पंडित : आँ?

रंगाचारी : म्हणजे शिल्लक असलेले सगळे.

पंडित : सगळे शिल्लक फ्लॅट तुम्हाला पाहिजेत?

रंगाचारी : शेठ खूश आहेत. ते तुमचे सगळे फ्लॅट घेतील स्वत:साठी... त्यांच्या भावासाठी... मॅनेजरसाठी... असिस्टंट मॅनेजरसाठी...

पंडित : आणि पागडी... भाडं... डिपॉझिट?

रंगाचारी : देणार! सगळं काही देणार, अटींप्रमाणे- अगदी फर्निचरच्या अटींसहित! मी सांगून ठेवलंय ना, शेठना.

पंडित : मिर्झाजी, ऐकलंत? ऐकलंस का कमलकांत? तुला गंमत वाटते, विनोद वाटतो; नाही का? बघा आताऽऽ तो वर बसलेला सगळं ऐकत असतो. धर्म-कर्मवाल्यांची व्यवस्थाही करत असतो.

बघा आताऽऽ! नऊच्या नऊ फ्लॅट गेले!!
(आनंदाने) भाडेकरू मिळावा तर असाऽ
धर्म-कर्माचा पक्का! सदाचारी... शुद्ध,
सात्त्विक भोजन करणारा!

रंगाचारी : आणि बालब्रह्मचारीसुद्धा आहेत.

पंडित : ऐकलंत मिर्झाजी, नाही तर तुम्ही!
(कमलकांत इथे जरा गडबडतो. पण मग
स्वत:ला सावरतो. म्हणतो-)

कमलकांत : वाऽ वाऽ! किराया वसूल करायचाय की
योग्यांचा मठ उभा करायचाय?

पंडित : चूप! बसाऽ... बसाऽ... तुमच्यासाठी
काय मागवू? सोडा- लेमन?

बिल्लू : नाही... नाही. नको.

पंडित : चहा?

बिल्लू : नाही. माझा उपवास असतो.

पंडित : अरे, मी तर विसरलोच होतो. आज
नागपंचमीचं व्रत आहे. पाहिलंत मिर्झाजी,
कमलकांत? पंधरा हॉटेलचा मालक-
आजसुद्धा नागपंचमीचं व्रत ठेवतो. वाऽ!
बघाऽ असा असतो खरा हिंदुस्थानी! ही
आहे आमच्या देशाची संस्कृती... हे
संस्कार! हा आमचा आदर्श... जय
रामजी कीऽऽ

बिल्लू : नमस्कारम्!
(रंगाचे डबे ठेवायला आलेल्या एका
मद्रासी मजुराकडे बिल्लूचं लक्ष जातं आणि
तो त्याला ओळखतो. आनंदानं
ओरडतोच...) अरेऽ अरेऽ मानकुट्टी- तू
इथे?

मानकुट्टी
मजूर : अय्योऽ! बिल्लू?
(दोघं एकमेकांना भेटतात)

बिल्लू : तू इथे कसा?

मानकुट्टी : आठ वर्षं इथे दिल्लीत आहे. बिल्डिंगला
रंगरंगोटीचं काम करतो. पण तू इथे
कसा?

बिल्लू : म्हणजे काय? माझं... आपलं मद्रास
हॉटेल नाही का दिल्लीत?

मानकुट्टी : मला कळलं होतं, तू खूप मोठा झालास
म्हणून... अय्यो, किती वर्षांनी भेटतोय
आपण, नाही?

बिल्लू : खूप वर्षांनी.

पंडित : (पुढे सरसावून) मारकुट्टी, तू यांना
ओळखतोस?
(त्यांनी बिल्लूच्या खांद्यावर प्रेमाने हात
ठेवला आहे.)

मानकुट्टी : (अभिमानाने) म्हणजे काय- ओळखत
नाही का? ओळखतोच! याचं नाव बिल्लू.
माझ्या गावचा मुलगा. माझ्या गावाच्या
चांभाराचा मुलगा! गाव सोडून बाहेर
पडला आणि त्याने किती प्रगती केली...
किती मोठा आणि श्रीमंत झालाय!
बिल्लूला कोण ओळखत नाही? हा पण
माझ्यासारखाच चांभाराचा मुलगा आहे.

पंडित : (खांद्यावरचा हात झटकून) बिल्लू...
चांभाराचा मुलगा?

रंगाचारी : (त्वरित पुढे येऊन) होऽ हो! हरिजन...
हरिजन.

पंडित : (दूर होऊन) हरिजन...

बिल्लू : होऽ आम्ही हरिजन आहोत. मग काय
झालं? आमच्या हॉटेलचे मॅनेजर ब्राह्मण
आहेत.

पंडित : मॅनेजर ब्राह्मण असले म्हणून काय झालं,
तुम्ही स्वत: तर हरिजन आहात?

बिल्लू : माझ्या हॉटेलचे आचारी सगळे ब्राह्मण
आहेत.

पंडित : कुक ब्राह्मण असले म्हणून काय झालं,
तुम्ही स्वत: हरिजन आहात नाऽऽ?

कमलकांत : बाबाऽ हे हिंदू आहेत. मांस-मच्छी खात
नाहीत. धर्म-कर्म करणारे बालब्रह्मचारी
आहेत.

पंडित : पण हरिजन आहेत ना! आणि मी त्यांना
स्पर्श करून चुकलो आहे. आता मी
अपवित्र झालोय... आता मला स्नान
करायला जावं लागेल.

कमलकांत : ही कोणती मनोवृत्ती? माणसाने माणसाला
स्पर्श करण्यामुळे माणूस अपवित्र होतो?
ही मनोवृत्तीच गंगेत बुडवून टाकली

पाहिजे... अगदी कायमची!

पंडित : बेटा, समजून घे जरा. हा माणूस हरिजन आहे. म्हणजे अस्पृश्य आहे... नीऽच!

बिल्लू : (उदास, गंभीरपणे) म्हणजे मी नीच! होऽ होऽ... मी हरिजन! म्हणजे मी झाडू तुमच्या घरातला? रस्त्यावरचा दगड? बाजारातला कुली? रेल्वेचं चाक पण... कारखान्यातला हात पण... शेतातला नांगरसुद्धा... माझ्यावाचून तुम्ही एक दिवससुद्धा जिवंत राहू शकत नाही... मग तुम्ही माझा तिरस्कार का करता... नफरत का करता?

पंडित : कारण पाच हजार वर्षांपासून आम्ही तुम्हाला भरडतो आहोत. तुम्हाला खातो आहोत. आम्ही तुमच्या उपकारांचं ऋण मान्य करायचं ठरवलं, तर तुमचं शोषण कसं करता येईल?

बिल्लू : या घरात माणसंच राहतात ना? का माणसं खाणारे मगरमच्छ?

कमलकांत : ओह्! इट इज ऑफुल बहुधा मला वेड लागणार, हे सगळं ऐकून.

पंडित : तुझी फिलॉसॉफी तू स्वत:जवळ ठेव, समजलं? इथे चर्चा वगैरे व्यर्थ आहे. या बिल्डिंगमध्ये कोणी हरिजन राहू शकत नाहीत. इथे मी जे सांगतो, तेच होईल...

रंगाचारी : म्हणजे तुम्ही आमच्या शेठजींना फ्लॅट देणार नाहीत तर?

पंडित : (रागाने) फ्लॅट? जर पुन्हा एखाद्या हरिजनाला इथे घेऊन आलास, तर मारून-मारून तुला 'फ्लॅट' करून टाकीन...

रंगाचारी : मोठा आलाय मारणारा! आमच्या शेठजींकडे तुमच्यापेक्षा जास्त पैसा आहे.

बिल्लू : आणि तुम्ही मला तुमच्या बिल्डिंगमध्ये जागा देत नसाल, तर मग मी वेगळी बिल्डिंग बांधेन! तुमच्यापेक्षा जास्त उच. जास्त मोठी बिल्डिंग! जास्त चांगली... तिथे मी तुम्हाला घुसू देणार नाही... (पंडित एका हाताने नाक दाबून ठेवतो, जणू दुर्गंध येतो आहे. दुसऱ्या हाताने जाण्याचा इशारा करतो.)

पंडित : जाऽ जाऽ इथून.

बिल्लू : चल रंगाचारी.

रंगाचारी : चला शेठ!

पंडित : जय रामजी कीऽ

बिल्लू : नमस्कारम्!

(दोघं जातात. पंडित पान खातो)

पंडित : खस कम् जहान पाक... (इडा-पीडा टळो.)

मिर्झा : अरे, तुम्ही तर एकदम फारसी बोलायला लागलात!

पंडित : संगतीचा दोष- दुसरं काय!

(इकडे कमलकांत आपला राग लपवण्यासाठी तोंडासमोर मासिक धरतो. त्याच्याकडे पाहून) मी जरा प्लंबिंगचं काम पाहून येतो. मुखर्जींनी फ्लोरिंगचं काम पण सुरू केलं आहे, त्यांचा निरोप आला होता. तर मी वर जाऊन बघतो. जर कोणी गिऱ्हाईक आलंच, तर सांभाळून घेऽ!

कमलकांत : काळजी करू नका. मी आहे इथे. मी आहेच!

(पंडित जातो. पाठोपाठ एक सुंदर मुलगी आत येते. नटलेली, आधुनिक, मोहक हसणारी. तिचं हसणं पाहून कमलकांत गडबडतो. उठून उभा राहतो.)

मुलगी : (हसत पुढे येते) डॅडी आलेत का?

कमलकांत : डॅडी? तुमचे?

मुलगी : अर्थात, माझे! तू माझ्या डॅडीला ओळखलं नाहीस का? तू त्यांना भेटला नाहीस?

कमलकांत : (हसत) तुला पाहिल्यानंतर तुझ्या डॅडींना भेटण्याचं कारणच नाही. दुर्दैवाने माझी न् त्यांची भेट झाली नाही अजून.

मुलगी : इट इज व्हेरी सरप्राइजिंग! त्यांनी मला फोन करून सांगितलं होतं की, ते मला इथे भेटतील. कमलकुंजमध्ये... हे कमलकुंजच आहे ना?

कमलकांत : होऽ तेच आहे.
मुलगी : ही जाहिरात तुमचीच?
कमलकांत : हो.
मुलगी : आम्हाला एक फ्लॅट पाहिजे. माझे वडील डॉक्टर आहेत. आम्ही कलकत्त्याहून आलो आहोत.
कमलकांत : (विरघळून, हसून) कलकत्ता सुंदर शहर आहे.
मुलगी : पण गर्दी खूप झालीय हो तिथे... नॉइझी आहे अगदी!
कमलकांत : नॉइझी... अगदी बरोबर...
मुलगी : तुम्ही गेला होतात कलकत्त्याला?
कमलकांत : (जरा ओशाळून) गेलो तर नव्हतो, पण मित्र सांगतात ना...
मुलगी : माझ्या डॅडींना की नाहीऽ गोंधळ-गडबड अजिबात पसंत नाही. त्यांना शांतता आवडते.
कमलकांत : (हसून) मला पण पसंत नाही.
मुलगी : पण मला पसंत आहे. मला ते जिवंतपणाचं प्रतीक वाटतंऽ
कमलकांत : (चापलुसी करत) अगदी बरोबर! जिवंतपणा... चहल-पहल, रौनक! कुणाला पसंत नसणार जिवंतपणा, नाही?
मुलगी : (घड्याळ पाहत) अजून आले नाहीत डॅडी.
कमलकांत : येतील... येतील.
मुलगी : मला म्हणाले की, ते एका पेशंटला पाहून इकडेच येणार आहेत. पण बिल्डिंगमध्ये फ्लॅट रिकामा आहे ना? नाही तर मी उगाचच टाइम वेस्ट करणार नाही.
कमलकांत : नऊ-नऊ फ्लॅट रिकामे आहेत.
मुलगी : तुम्ही जोक करताय?
मिर्झा : नाही... नाही. खरंच!
मुलगी : त्यापैकी मला एक फ्लॅट मिळेल का?
मिर्झा : का नाही? नक्की मिळेल.
मुलगी : (मिर्झाशी हात मिळवते.) थँक्यू... थँक्यू. (ते पाहून कमलकांत बेचैन होतो. त्याला जरा असूया वाटते.) थँक्यू. दोन दिवसांपासून आम्ही बाप-बेटी घराच्या शोधात आहोत. पण अखेर इथे मिळाला फ्लॅट! (मिर्झाला उद्देशून) मला तर असं वाटतंय की, मी तुमचं चुंबन घ्यावं...
मिर्झा : आँ? काय?
मुलगी : चुंबन... किस्! तुमचं नाव काय?
मिर्झा : (ऐटीत) तसं तर माझं नाव मिर्झा इर्शाद हसीन चंगैझी इल्तीहनस अली लखनवी आहे. पण तुम्ही मला फक्त 'अच्छन' म्हटलं तरी चालेल...
मुलगी : अच्छन! किती गोऽड, नाहीऽ... आणि तुम्ही कोण आहात इथे? (कमलकांतला विचारते.)
कमलकांत : मी या बिल्डिंगच्या मालकाचा मुलगा आहे.
मुलगी : हाऊ स्वीऽट! हाऊ नाईस... नाव?
कमलकांत : कमलकांत.
मुलगी : मला एक फ्लॅट पाहिजेच आहे. द्याल ना!
कमलकांत : कोणताही एक पसंत कराऽ, नऊ रिकामे आहेत.
मुलगी : ते तर मी नंतरही करू शकते. आधी मी माझं सामान हॉटेलमधून मागवून घेते.
कमलकांत : पण...
मुलगी : म्हणजे, मला डॅडींना सरप्राईज करायचंय ना...
कमलकांत : ओके.
मुलगी : थँक्यू. (त्वरेने फोन करते) गिव्ह मी रूम नंबर २५०. हॅलो, कोण अंकल रामभरोसेऽ? माझं सामान घेऊन या ना इथे, कमलकुंजला... तुम्हाला माहीतच आहे कमलकुंज. जवळच आहे. लवकर या हं!
(रिसिव्हर ठेवते आणि सुटकेचा नि:श्वास टाकते.)
कमलकांत : चलाऽ फ्लॅट दाखवतो तुम्हाला. बघा, पसंत करा.
मिर्झा : (चापलुसी करत) तुम्ही कशाला त्रास घेता? मी आहे ना, मी दाखवतो.
कमलकांत : मला वाटतं, तुम्ही डिसुझांना भेटून या. वीज आलेली नाही अजून.

मिर्झा : (हसत) आणि लाकूड अजून आलं नाही. संपलंय! तुम्ही सरदार गुरुदयालसिंगच्या दुकानी जाऊन आलात, तर बरं होईल. दरवाजे बनायचे आहेत अजून!

कमलकांत : बाबा सांगून गेलेत, वीज आली नाही. बिजली-घर जाऊन याऽ! चला, मी दाखवतो फ्लॅट.

(दोघे जातात. मिर्झा एकटाच राहतो. पाहत, चडफडत)

मिर्झा : आणि इकडे आम्ही फ्लॅट! चांगलाऽ मी दाखवत होतो तर... (फाईल आपटतो) लानत है...! कसली नोकरी ही? (फाईल उचलत, बदललेल्या आवाजात) पण काय करणार? नोकरी आहे, जावं लागेल. जातो, झालं! चांगला दाखवत होतो फ्लॅट... पण नाही...

(जातो त्वरेने. पाठोपाठ रामभरोसेचा आवाज)

रामभरोसे : बल्लू...

(मंचावर कोणी नाही. थोडा वेळ मंचावर शांतता. मग विंगेतून पुन्हा आवाज येतो.)

बल्लू... बेटा, आहेस कुठे?

(मध्यमवयीन रामभरोसे सूटकेस इत्यादी घेऊन येतो. त्याच्यामागोमाग एक मजूर आणखी काही सामान घेऊन येतो.)

रामभरोसे : अरे, इथे तर कोणी दिसत नाही...

मजूर : पण कमलकुंज तर हेच आहे!

रामभरोसे : ठीक. मग सगळं सामान इथेच ठेव. बेटी कुठे तरी इथेच असेल. येईल आता...

(पाठोपाठ आणखी दोन मजूर गडबडीने अन्य सामान आत आणतात. रामभरोसे खुर्चीवर बसतात.) हे घ्याऽ (पैसे देतात.)

मजूर : कमी आहेत साहेब!

रामभरोसे : (आणखी पैसे देत) खूश? झालं ना आता?

मजूर : हो मालक! राम राम!

(तिघं जातात. ते गेल्यानंतर रामभरोसे काही क्षण फिरत्या खुर्चीवर बसून थोडं जागच्या जागी हलत विश्रांती घेतात आणि पाठोपाठ डॉक्टर येतात. हातात मेडिकल बॅग. कोटाच्या खिशात स्टेथास्कोप. येताच त्यांची नजर आपल्या सामानावर पडते. मग ते डोळे झाकून बसून झोके घेणाऱ्या रामभरोसेकडे पाहतात. त्याच्याकडे आणि आपल्या सामानाकडे आश्चर्याने पाहतात. मग रामभरोसेला उठवतात. तो दचकून उठतो.)

डॉक्टर : रामभरोसे... तू इथे काय करतोस? आणि आपलं सामान इथे कसं?

रामभरोसे : आपल्या बल्लू बिटियाने फोन केला होता, सरकार. सामान घेऊन लगेच इथे यायला सांगितलं होतं, मी घेऊन आलो...

डॉक्टर : बल्लूने फोन केला होता?

रामभरोसे : हो, सरकार.

डॉक्टर : म्हणजे तिला फ्लॅट मिळाला असणार, नाही तर ती चुकीचा निरोप देणारच नाही. मी पेशंटमुळे उशिरा आलो जरा. बल्लू कुठे आहे?

रामभरोसे : मी आलो, तेव्हा त्या नव्हत्या इथे. मला माहीत नाही. पण कमलकुंज हेच आहे, हे नक्की.

डॉक्टर : बिल्डिंग तर नवी आहे... फ्लॅट पण चांगले असतील...

रामभरोसे : बिटिया चांगलाच फ्लॅट निवडेल ना!

(पंडित रामदयाळ आणि मुखर्जी येतात. चर्चा चालली आहे)

पंडित : मुखर्जीसाहेब, तीन दिवसांत फरशी लावण्याचं काम पूर्ण झालं तर चांगलं...

मुखर्जी : बंगाली माणसाचा शब्द आहे पंडितजी. होईल, होऊन जाईल.

(चालता-चालता सामानामुळे अडखळतात. आश्चर्याने)

पंडित : अरे, हे सामान कोणाचं आहे?

डॉक्टर : आमचं आहे. आणखी कोणाचं मग?

पंडित : आणि तुम्ही कोण?

डॉक्टर : आणि तुम्ही कोण?

पंडित : ते तर मी नंतर सांगेन... पण आधी हे

सांगा की, तुम्ही कोण आहात? आणि तुम्हाला सामान आणण्याची परवानगी कोणी दिली?

डॉक्टर : सामान तर भाडेकरूच आणणार ना? माझ्या मुलीने इथे फ्लॅट भाड्याने घेतला आहे.

पंडित : असं? कदाचित घेतला?

डॉक्टर : (रागाने) कदाचित नाही, नक्कीच. तिला खात्री नसती, तर तिने नोकराला फोन करून सामान आणायला कशाला सांगितलं असतं?

पंडित : पण मुलगी कुठे आहे?

डॉक्टर : तेच तर मी विचारतोय तुम्हाला- माझी मुलगी कुठे आहे?

पंडित : मी काय तुमच्या मुलीचा रक्षक आहे का?

डॉक्टर : पण तिने आत्ता इथून टेलिफोन केला होता. काय रामभरोसे?

रामभरोसे : जी मालक. म्हणून तर मी आलो सामान घेऊन.

डॉक्टर : आणि तुम्ही म्हणता की, तुम्हाला काही माहीतच नाही... You wicked old man!! (एकदम पुढे होऊन पंडित रामदयाळच्या शर्टाची कॉलर पकडतो.) माझी मुलगी कुठे आहे? नाही तर आत्ता पोलिसांना फोन करेन...

पंडित : आऽ... आऽ... आऽ
(मुलीचा आवाज येतो)

मुलगी : डॅडी... डॅडी... डॅडी ऽ!
(डॉक्टर वळून पाहतात. त्याच वेळेला मुलगी बल्लू आणि कमलकांत येताना दिसतात. डॉक्टर कॉलर सोडतात. पंडित धापा टाकतो आहे. मुलगी धावत डॉक्टरकडे येते.) डॅडी, मी फ्लॅट पाहून, पसंत करून आले आहे. It is a very nice flat! Two big bedrooms, two big bathrooms and a big hall! A big kitchen and a big pantry... lovely flat! किराया फक्त सातशे रुपये!

डॉक्टर : तू नक्की केलंस?

मुलगी : ही चावी बघा ना! म्हणजे नक्की झालंच ना?

पंडित : (कमलकांतला उद्देशून) तू यांना फ्लॅट दिलास?

कमलकांत : हो बाबा!

पंडित : पण हे आहेत तरी कोण?

कमलकांत : (घाबरून) पण मी... मी विचारलंच नाही.

पंडित : नावसुद्धा विचारलं नाही आणि भाड्याने फ्लॅट देऊन टाकलासऽ?

कमलकांत : यांचं नाव बल्लू आहे वाटतं!

पंडित : बल्लू? बिमला? बलवंत कौर? बतौल? नक्की काय?

कमलकांत : मी विचारलं नाही आणि माझ्यासाठी बल्लू पुरेसं आहे.
(मुलगी आणि कमलकांत एकमेकांकडे पाहून हसतात.)

मुलगी : मी सांगते, माझं नाव अजाबयिला आहे. म्हणून बल्लू! हे माझे वडील- डॉक्टर आयडोर उकोईलो. हिंदुस्थानातले प्रसिद्ध हार्ट स्पेशालिस्ट!

पंडित : (मोठ्याने) आयडोर उकोईलोऽ? म्हणजे ख्रिश्चन? (बाप आणि मुलगी होकारार्थी डोकं हलवतात) हे भगवान... माझा धर्म भ्रष्ट झाला! (रागाने) चलाऽ निघून जाऽ निघून जा इथून... बदमाश...! माझ्या घरातून निघून जाऽ

कमलकांत : बाबाऽऽ?

पंडित : मी त्यापेक्षा मरून जाईन, पण तुम्हा लोकांना बिल्डिंगमध्ये घुसू देणार नाही. समजलं? निघून जा... निघून जा इथून...
(मिर्झा फाईल घेऊन येतो. आश्चर्याने पाहत उभा राहतो.)

डॉक्टर : जातो. पण आपण कोर्टात भेटू. आधी हो म्हणून नंतर नाकारलं म्हणून दंड वसूल करीन- पन्नास हजार रुपये! समजलं?

पंडित : जाऽ! लाखो वसूल कर... पण इथे, या बिल्डिंगमध्ये राहता येणार नाही. जाऽ...

जाऽऽ... आऽऽ
(एकदम छातीला हात लावून विव्हळत कोचावर पडतो.)

कमलकांत : बाबाऽ (धावतो. सावरण्याचा प्रयत्न करतो.)
(मुखर्जी आणि मिर्झासुद्धा घाबरतात.)

मिर्झा : बहुतेक हार्ट ॲटॅक...

डॉक्टर : चल बेटा, जाऊ आपण.
(डॉक्टर बल्लूला घेऊन जाऊ लागतात. ती वळून पाहते आहे. मात्र कमलकांत धावत येतो.)

कमलकांत : डॉक्टरसाहेब... डॉक्टरसाहेब...

डॉक्टर : माझा हात सोड...

कमलकांत : हार्ट ॲटॅक आहे... बघा, ते कसं करताहेत–

डॉक्टर : मग मी काय करू?

कमलकांत : दया करा... त्यांना वाचवा!

डॉक्टर : मी ख्रिश्चन आहे. मी स्पर्श केल्याने त्यांचा धर्म भ्रष्ट होईल... मला जाऊ देऽ

कमलकांत : चलाऽ परत चला, डॉक्टरसाहेब... त्यांना वाचवा! वृद्ध आहेत, जुन्या विचारांचे आहेत... पण बाबा आहेत माझे. त्यांना माफ करा. ते बोलले असतील, पण त्यांना माफ करा... त्यांना वाचवा. चलाऽ प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे...
(डॉक्टर मुलीकडे पाहतात. मुलगी सहमतीपूर्ण नजरेने पाहते. डॉक्टर परत येतात. पंडितच्या भोवताली थांबलेले लोक मागे सरकतात. डॉक्टर पंडितला पाठीवर नीट झोपवतात. तपासणी करतात. मग बॅगेतून इंजेक्शन काढून ते देतात. मुलगी मदत करत राहते. पंडित अगदी बेशुद्ध पडलाय. डॉक्टर घड्याळ पाहत राहतात. मंचावर गंभीर शांतता. मग पंडित हालचाल करतो. हळूहळू तो डोळे उघडतो. हळूहळू उठू पाहतो.)

डॉक्टर : उठू नका, पडून राहा.

पंडित : नाही, मला उठून बसवा.

कमलकांत : डॉक्टरसाहेबांनी तुम्हाला वाचवलंय बाबाऽऽ
(पंडित उठून बसतो.)

मिर्झा : ज्यांनी तुम्हाला वाचवलं, त्यांचे आभार तरी माना शेठजी... गप्प का?

डॉक्टर : निसर्गाचा हा चमत्कारच मानला पाहिजे. एका मिनिटापूर्वी तुमची नाडी बंद पडली होती... हृदय पण बंद होतं... श्वास थांबला होता...

पंडित : पण मी मेलो नव्हतो डॉक्टर... मला वाटलं की, मी एखाद्या दूरच्या प्रवासाला निघालो आहे.
(पंडित हळूहळू उभा राहतो. मध्यभागी येतो. उचित संगीत आणि पंडितवर प्रकाशवर्तुळ)

डॉक्टर : अंऽऽ!

पंडित : आणि रस्त्यात मला आपल्या बिल्डिंगचा आत्मा भेटला!

डॉक्टर : बिल्डिंगचा आत्मा?

पंडित : (गंभीरपणे) हो डॉक्टर, बिल्डिंगचा आत्मा! प्रत्येक माणसाचा जसा आत्मा असतो ना, तसा प्रत्येक बिल्डिंगचा पण एक आत्मा असतो. प्रत्येक वंशाचा आत्मा असतो, प्रत्येक देशाचा आत्मा असतो... बिल्डिंगचाही असतो. आपल्या बिल्डिंगचा आत्मा मला त्या अदृष्टाच्या दीर्घ प्रवासात वाटेत भेटला. मी म्हटलं– चल, मिळून जाऊ प्रवासाला...

कमलकांत : अं! मग?

पंडित : मी म्हटलं– चल, तुझा आणि माझा रस्ता एकच आहे. तर म्हणाला, नाही. या रस्त्याने जाऊन तू आणि मीही मुक्कामाला पोहोचू शकणार नाही!

कमलकांत : मग?

पंडित : तो म्हणाला की, हा रस्ता आता जुना झाला आहे. हा रस्ता कुठेच घेऊन जात नाही, जाणार नाही! मी म्हटलं, मग पुढे जाण्याचा मार्ग तरी कोणता? तो गंभीरपणे म्हणाला की– जी माणसं आपल्या मागे घरांचे दरवाजे उघडे ठेवतात ना, तीच

माणसं पुढे जाऊ शकतात. ते ऐकल्यानंतर मी परत आलो. (खिशातून चाव्यांचा गुच्छ बाहेर काढतो.) कमलकांत, ह्या चाव्या तुला द्यायला मी परत आलो. (चाव्यांचा गुच्छ देतो.) तू या चाव्या घे आणि आपल्या बिल्डिंगचे सगळे दरवाजे सताड उघडे ठेव.

कमलकांत : अं?

पंडित : आपल्या बिल्डिंगचा नकाशा एका बंगाल्यानं बनवलाय. राजस्थानी मजुरांनी विटा रचल्यात. मल्याळी कारागिरांनी बिल्डिंगला रंग लावलाय. पंजाबी सुतारांनी याचे दरवाजे आणि खिडक्या बनवल्या आहेत. मुसलमानांनी फरशा बसवल्या आहेत. डिसुझा ख्रिश्चन आता या बिल्डिंगमध्ये वीज आणेल. अब्राहम प्लंबिंगचं काम करेल, रुस्तुम संट्री संरक्षण करेल. ही बिल्डिंग... हे घर सगळ्यांनी मिळून बांधलंय! हिंदू, मुसलमान, शीख, इसाई, बौद्ध, पारशी, यहुदी... सर्वांनी मिळून हे घर बनवलंय! या घरात जर सगळे मिळून एकत्र राहिले नाहीत, तर हे घर आबाद कसं होईल? सुजलाम्-सुफलाम् कसं होईल? या घराची प्रगती कशी होईल? या घराचा झेंडा आकाशात फडकायचा असेल, उंच लहरायचा असेल तर- सर्वांचं योगदान मान्यच करावं लागेल! म्हणून मी त्या अदृष्टाच्या प्रवासातून परत आलो... म्हणून या चाव्या, हे भवितव्य मी तुझ्या ताब्यात देतो आहे, कमल बेटा! आता या घराचे सगळे दरवाजे, सगळी बंद दारं उघड- उघडून टाक! या बिल्डिंगच्या उभारणीसाठी ज्यांचे हात लागले, त्या सुपुत्रांना बोलावून घे! करीम उल्ला सायंटिस्टना, आफताब रायना, बिल्लू आणि रंगाचारींना, मिर्झाच्या मित्राला आणि गुरुदयालसिंगना... आणि सगळ्या सगळ्यांना बोलावून घ्याऽ! ज्यांनी ही बिल्डिंग उभी केली, हा देश उभा केला- त्या साऱ्यांचा हा देश, साऱ्यांची ही इमारत- ही बिल्डिंग! ज्यांनी या भिंती उभारल्या, ज्या आडोशाला अश्रू वाहू दिले, त्यांची आहे ही बिल्डिंग... या परिसरात मानवी आकाक्षांना पालवी फुटली आहे, स्वप्नांनी आकार घेतला आहे! ज्यांनी माणूस म्हणून इथे अस्तित्व पेरलं, त्यांची आहे ही इमारत... ही बिल्डिंग! हा देश! आता ही बिल्डिंग एकट्या पंडित रामदयाळची नाही... हे घर आता तुम्हा सर्वांचं आहे. सर्वांचं योगदान आहे इथे... इथे कोणाचा द्वेष नाही... नफरत नाही... ही बिल्डिंग इथल्या सर्वांची आहे. बोलवा सर्वांना आणि बंद दरवाजे उघडाऽऽ दरवाजे खोल दोऽऽ!

(हळूहळू ती बिल्डिंग बनवणारे मजूर, कामगार, सुतार, रंगारी, या घरात भाड्याने राहू इच्छिणारे भाडेकरू, आधी येऊन गेलेली सगळी पात्रं, सगळे नोकर, मिर्झा, मुखर्जी- सगळे पंडितच्या भोवती गोळा होतात. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उल्हास. आनंदी असा एखाद्या गीताचा स्वर हळूहळू ऐकू येतो आणि वाढत जातो. त्या पाठोपाठ पडदा हळूहळू खाली येतो.)

(१९६४ मध्ये 'कौमी एकता' चळवळीचा भाग म्हणून लिहिले गेलेल्या 'दरवाजे खोल दो' या उर्दू नाटकाचे प्रयोग त्या काळात प्रायोगिक मंचावर झाले. त्यानंतर हे नाटक रेडिओवरूनही सादर केले गेले. मराठीत मात्र या नाटकाचे प्रयोग कधी झाल्याचे वा या नाटकाचा अनुवाद पूर्वी कधी झाल्याचे पुरावे उपलब्ध नाहीत.)

चिंतन

# लोकसमजुतीचे पितळ उघडे पाडणारे नाटक!

ख्वाजा अहमद अब्बास

अनुवाद : भारत सासणे

**कृष्ण चंदरमध्ये आणखी दोन गुण दिसून आले. पहिला गुण हा की, नाटकातला सस्पेन्स प्रथमपासून अखेरपर्यंत कायम राहतो. दुसरा गुण असा की- नाटकातले संवाद धारदार, अर्थपूर्ण आणि पल्लेदार असे असतात. एक-एक संवाद म्हणजे फुलझडीच. पण ही आतषबाजी केवळ नेत्रदीपक, श्रवणमधुरच असते असं नाही. हे शब्द, त्यातले अर्थ मनाच्या आणि मेंदूच्या गाभाऱ्यात प्रवेश करतात- विचार करायला लावतात, हे मोठंच सामर्थ्य आहे. नाटककाराची अर्थपूर्णता आहे. त्याचं यश आहे.**

**कृष्ण चंदरसारख्या पुरोगामी लेखकाने 'कौमी एकता'सारखा विषय निवडला, यशस्वीपणे हाताळला, हे आपलं चांगलं नशीबच म्हटलं पाहिजे. या नाटकात द्रष्टेपणा आहे. 'दूरचा इशारा'ही आहे. 'दरवाजे खोल दे' हे शीर्षक बोलकं तर आहेत, पण सूचकही आहे. राजकीय व भावनिक भाष्यांपासून, विषयांपासून वेगळं होऊन हे नाटक माणुसकीबाबत आणि मायनॉरिटीच्या समस्यांबाबत खुबीने बोलतं. कृष्ण चंदर लेक्चर देत नाहीत, भाषण आणि सल्ले देत नाहीत. भ्रमाच्या व समजुतीच्या वजनदार फुग्याला फक्त टाचणी टोचतात आणि फुग्यातील हवा काढून घेतात.**

: १ :

पूर्वी माणूस पहाडाच्या गुहेत राहत असे. दिवसभर अन्नासाठी शिकार करायचा. थंडी-वाऱ्यापासून आणि पावसापासून संरक्षण म्हणून मग रात्री गुहेत येऊन झोपायचा, बायका-मुलांसह. गुहेला दरवाजा नसायचा. आत-बाहेर जाण्या-येण्यावर त्यामुळे बंधनही नसायचं. कालानुक्रमे नंतर माणसाने राहण्यासाठी झोपडी बांधली. चार भिंती, एक छत, एक दरवाजा, एक खिडकी- अशी योजना होती. रात्री भय असायचं जंगली श्वापदांचं, चोरांचं, हल्लेखोरांचं. म्हणून मग तो रात्री दरवाजे आणि खिडक्या बंद करायला लागला. पुढे पक्कं घर बनलं राहण्यासाठी, जे मोठंही होतं. उंच भिंती, दरवाजे आणि खिडक्या. पण इतकंच नाही, दरवाजांना कोयंडे पण लावले गेले. कड्या पण लावल्या गेल्या आणि कुलपंही आली. खिडकीला गज आले. आत जाणं मुश्किल, बाहेर येणं मुश्किल.

जसजसा माणूस प्रगती करीत राहिला, धनसंपत्तीचा विकास होत राहिला; तसतशी त्याच्यात 'स्वामित्व भावना'सुद्धा विकसित होत राहिली. पाठोपाठ त्याच्या दरवाजांना मोठमोठी कुलपं लागली. चौकीदार आणि पहारेकरी नेमले गेले.

आणि आता तर इतकी प्रगती झालीय की, घरं एअरकंडिशन्ड झालीत आणि दरवाजे व खिडक्या बंद

झाल्यात.

मला स्वत:ला एअरकंडिशन्ड खोल्यांची मोठी भीती वाटते. ती कल्पनाच रानटी आणि क्रूर वाटते. माझा तर श्वासच कोंडला जाऊ लागतो.

(अर्थात, जेल आणि वेड्यांची इस्पितळं एअरकंडिशन्ड करायला माझी हरकत नाही.) ज्यांना आपली घरं वातानुकूलित करायचीत, त्यांनी ती तशी करावीत; मात्र त्यांनी त्यांच्या मनाचे दरवाजे आणि मेंदूच्या खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

: २ :

मनाचे दरवाजे आणि मेंदूतल्या खिडक्या!

यांना बंद ठेवण्याच्या किती तरी जुन्या आणि नव्या तऱ्हा आहेत, पद्धती आहेत. जातीपातीची ढोंगं, अफेक्शन्स याबद्दल काय बोलायचं? (पण बोलायचं तर आहे.) हा ब्राह्मण, हा क्षत्रिय, हा वैश्य, हा शूद्र, हा अस्पृश्य... याने वेद ऐकले, तर त्याच्या कानांत वितळलेलं शिसं टाका. पण हा शेकडो वर्षांपूर्वीचा हिंदुस्तानी समाज होता. म्हणजे जुन्या गोष्टी. पण अमेरिका? प्रगत आणि आधुनिक आहे ना? तिथे 'निग्रो' अस्पृश्यच नाहीत का? गोऱ्यांच्या शाळेत काळ्यांची मुलं एकत्र शिकू शकत नाहीत. मला असंही सांगण्यात आलं आहे की, इंग्लंडमध्ये हिंदुस्तानी काळे आणि वेस्ट इंडिजमध्ये काळ्यांना (आर्थिक क्षमता असूनही) राहण्यासाठी घरं मिळत नाहीत. जर्मनीत हिटलरचं ऐकून तिथल्या लोकांनी मनाची कवाडं आणि मेंदूतल्या खिडक्या बंद केल्या होत्या. म्हणजे मनही (संवेदना) बंद आणि मेंदूही (विवेक)बंद! परिणाम आपल्याला माहीतच आहे. ज्यूंच्या भयानक कत्तली आणि त्यांच्या छळछावण्या व त्यांचं देशोधडीला लागणं– त्या आठवणी किंवा ती चर्चा नकोच.

हृदयातले दरवाजे आणि मेंदूच्या खिडक्या जेव्हा बंद होतात; तेव्हा तिरस्कार, द्वेष व नफरत जन्माला येते. हे विष नंतर सर्वत्र पसरायला वेळ लागत नाही. काय होत असेल त्यामुळे? हे दरवाजे आणि खिडक्या तर बंद करायला लावल्या जातात. त्यानंतर आणि त्यामुळे माणूस स्वत:चा म्हणून विचारच करू शकत नाही. त्याची बुद्धी बंदच होते. शंका अन् संशय, मनाचा कोतेपणा आणि संकुचितपणा त्यानंतर वर्तनातून जन्म घेतो. हे विषाक्त जगणंच.

: ३ :

आता दारं-खिडक्या बंद झाल्यामुळे धर्माच्या अस्तित्वाचं काय होत असावं? उन्माद आणि 'जोश-जुनून'च्या स्वरूपात धर्म प्रकटायला लागतो. असा धर्म माणसाला परमात्म्याकडे नेऊ शकत असेल का? परमात्मा तर दूरच, माणूसच माणसापासून दुरावतो. धर्मांधता मात्र शिल्लक राहते. ही धर्मांधता, हा धर्मोन्माद माणसांना नफरत करायला शिकवतो. एकमेकांशी लढायला प्रवृत्त करतो. कत्तली करायला शिकवतो. मनाची कवाडं बंद झाल्यानंतर (करवल्यानंतर?) धर्मोन्माद माणसाला हे सगळं करायला शिकवतो.

धार्मिक माणूस मनाचे दरवाजे उघडे ठेवतो तेव्हा तो राम-कृष्णाच्या, परमहंसांच्या, महात्मा गांधींच्या किंवा विवेकानंदांच्या जवळ जातो. विचारांनी बद्ध नसल्यामुळे तो कबीराच्याही जवळ जातो. नानकाच्याही जवळ जातो. अशोकाचा सेवाभाव आणि त्याचं परिमार्जन त्याला समजतं, त्याला अकबर पण समजतो. मग त्याचा धर्म कोणाला दु:ख देत नाही, कोणाचा अपमान करीत नाही, कोणाची नफरत करीत नाही. माणूस शुद्ध स्वरूपात माणूसच राहतो.

पण त्याउलट, माणूस मनाचे दरवाजे आणि मेंदूच्या खिडक्या जेव्हा बंद करतो, तेव्हा तो नथुराम गोडसे बनून जातो. लाखो माणसं जेव्हा मनाची कवाडं आणि विवेकाच्या खिडक्या बंद करतात; तेव्हा सन एकोणीसशे सत्तेचाळीसमध्ये हिंदुस्थान-पाकिस्तानात जे झालं, ते घडत राहतं. त्याने लाखो माणसं मारली गेली. हजारो स्त्रियांवर अत्याचार झाले. करोडो माणसं बेघर झाली. ज्यांनी हे सगळं केलं-घडवलं ते मारेकरी, लुटेरे, पाशवी माणसं त्याच धार्मिक घोषणा आणि नारे देत फिरत राहिले, उद्याही राहतील. या घोषणा खरं तर आध्यात्मिक होत्या–

– हर हर महादेऽव

– अल्लाऽ हो अकबरऽ!

: ४ :

मी सन एकोणीसशे पस्तीसमध्ये मुंबईत आलो. मी ज्या वृत्तपत्रात काम करीत होतो, तिथले बुजुर्ग असलेले असिस्टंट एडिटर माझ्यावर माया करीत. ते माझ्यावर मेहेरबान होते. मला प्रेमाने वागवीत. ते महाराष्ट्रीय ब्राह्मण होते. गांधींच्या आश्रमात राहून आले होते. छूत-अछूत, जात-पात हे सगळं त्यांनी सोडून दिलं होतं. तांब्याच्या भांड्यातून पाणी पीत आणि त्याच भांड्यातून मलाही पाणी देत. आमचं दुपारचं जेवण एकत्र असे. एका रविवारी ते

मला त्यांच्या घरी घेऊन गेले. आपल्या कुटुंबीयांशी त्यांनी मला भेटवलं. सगळे मोठ्या प्रेमाने, अदबीने भेटले. दिवसभर मी त्यांच्या संगतीत राहिलो. जेवलो. दुपारी त्यांच्या बरोबरीनेच थोडी विश्रांती घेतली, चटईवर.

नंतर तर तो प्रघातच पडला. प्रत्येक रविवारी मी त्यांच्याकडे जायचो, त्यांच्यात मिसळायचो. त्या कुटुंबाबरोबर राहायचो. काही महिन्यांतच मी त्या कुटुंबाचा जणू सदस्यच झालो.

आणि मग एक दिवस अचानक मी माझ्या मानलेल्या आईच्या तोंडून ऐकलं,

''किती चांगला आहे, हा आपला अब्बास! ...बिलकुल मुसलमान वाटत नाही!''

म्हणजे 'मुसलमान न वाटणाऱ्या' माझ्यासारख्यासाठी त्यांनी मनाची कवाडं उघडली होती, इतर मुसलमानांसाठी मात्र नाही– ती बंदच होती. लाखो–करोडो हृदयांचे दरवाजे तेव्हाही बंद होते, आजही बंद आहेत.

लहानपणी ऐकलं होतं की, हिंदूंच्या दुकानांतून काही घेऊन खायचं नाही. ते काफिर असतात– म्हणून ते घाणेरडे असतात. असंच हिंदू मुलांना सांगितलं जायचं, कारण ते म्लेंच्छ असतात, म्हणजे त्याज्यच. गंमत पाहा. लहानपणी स्टेशनवर एकाच बादलीतून पाणी काढलं जायचं विहिरीतून. पण ते 'अहमद'च्या भांड्यात पडलं की, ते 'मुसलमान पाणी' व्हायचं आणि 'रामदयाळ'च्या भांड्यात पडलं की, तेच पाणी 'हिंदू पाणी' होऊन जात असे.

अस्पृश्यांसाठी मंदिराचे दरवाजे बंद होते, आताही आहेत. ती मंडळी उच्च जातीवाल्यांच्या विहिरीतून पाणी काढू शकायची नाहीत, आताही हे प्रतिबंधितच आहे. त्यांच्याबरोबर बसून जेवण करणं अशक्यच. अस्पृश्यांची मुलं उच्च जातीवाल्यांच्या मुलांबरोबर शिकू शकायची नाहीत, खेळू शकायची नाहीत. या बंद दारांना समाज अधिक मजबुतीने बंद करीत राहिला आणि मग राजकारणाने पूर्ण विभाजन तर आणलंच.

– 'मुस्लिम आहेस ना, मग मुस्लिम लीगमध्ये येऽ'

– 'हिंदू आहेस ना, मग हिंदू महासभेत येऽ'

महात्मा गांधींनी अस्पृश्यांसाठी मंदिराचे आणि मनाचे दरवाजे उघडण्यासाठी मोहीम हाती घेतली. पण त्यांनासुद्धा हे दरवाजे पूर्णत्वाने उघडता आले नाहीत. 'वरच्या जाती'ची मंडळी मनोरुग्ण होत राहिली. त्यांच्या मनाची कवाडं बंदच राहिली. आपलं 'स्वत:चं असं राजकारण



ख्वाजा अहमद अब्बास

फार वेगाने नसले तरी बऱ्याच वेगाने
हिंदुस्थानात औद्योगिकीकरण येते आहे.
मोठमोठे कारखाने बनताना दिसताहेत.
कालपर्यंत जी लाखो माणसं गावातून नांगर
चालवीत होती, ती आता मोठमोठ्या कारखान्यात
मोठमोठ्या यंत्रांबरोबर काम करीत आहेत.
त्याच्या छोट्या गावातल्या छोट्या सामाजिक
समजुती आणि रीती आता इथे लागू पडत नाहीत.
आता आपल्या समाजात परिवर्तन घडतं आहे.
पण तरीही फरक समजून घेतला पाहिजेच.
यांत्रिकीकरणाने परिवर्तन अपरिहार्य होऊन
लादलं जाणं आणि वैचारिक पातळीवर
मेंदूतल्या खिडक्या उघडल्या जाणं,
यात फरक असतो. मशीन चालवायला
शिकता येतं तीन–चार महिन्यांत,
पण बुद्धिवाद शतकांतूनसुद्धा अंगीकारता येत नाही.
अर्थात, मनाची मशागत झाली आणि
शिक्षणाचा प्रसार झाला, तर
वैचारिक परिवर्तन अशक्य नाही.

आणि आपला समाज’ त्यांनी वेगळा राखला. महात्मा गांधींनी आणि अन्य मंडळींनी हिंदू-मुस्लिम ऐक्य राखण्यासाठी वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. सगळा देश ‘हिंदू-मुस्लिम भाई-भाई’च्या नाऱ्यांनी दुमदुमला होता. पण हे नारे ‘मायनॉरिटी’वर परिणाम करू शकले नाहीत. उलट, हे नारे हिंदू आणि मुसलमान वेगवेगळे आहेत, हेच अधोरेखित करीत राहिले. दोघांचं राजकारणसुद्धा वेगळं राहिलं.

जमीनदारी- Feudalism चे परिणाम इतिहासात नोंदवले गेले आहेत. धार्मिक आणि वांशिक क्षेत्रात दिसून येणारा ‘मानसिक कोतेपणा’ हा भावनेचे ‘अपील’ किंवा धार्मिक संहिता यांमुळे नष्ट होत नसतो. वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे हा कोतेपणा दूर होऊ शकतो. इंडस्ट्रियलायझेशनमुळे हा कोतेपणा दूर होऊ शकतो. युरोपात रोमन कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट यांमधला संघर्ष तेव्हाच नष्ट झाला, जेव्हा दोघांना एकाच मालकाच्या कारखान्यात मजुरी करावी लागली.

भारतात हे झालं आहे. जात-पात, छूत-अछूत आदी अवडंबरांवर मुंबई आणि कलकत्ता यासारख्या औद्योगिक शहरांतून पहिला प्रहार झाला. मजूर आपापल्या गावातून आपापल्या कुटुंबासह कारखान्यात भरती होण्यासाठी जेव्हा आले, तेव्हा जातीपातीचे प्रश्न गौण ठरले. त्यांच्या-त्यांच्या लहानशा गावातले संकुचित सामाजिक विचार इथल्या प्रचंड विस्ताराने गिळून टाकले. मुंबईची ‘इराणी हॉटेलं’ सामाजिक परिवर्तनाची ठिकाणं बनली. भारतीयांनी एकाच ठिकाणी जाऊन एकत्रितपणे खाणं-पिणं चालू ठेवणं (कारण तसंच करणं भाग होतं.) विलक्षण होतं. त्यामुळे प्रथमच वेगवेगळे समाज एकत्र आले, भाकरीच्या निमित्ताने.

फार वेगाने नसले तरी बऱ्याच वेगाने हिंदुस्थानात औद्योगिकीकरण येते आहे. मोठमोठे कारखाने बनताना दिसताहेत. कालपर्यंत जी लाखो माणसं गावातून नांगर चालवीत होती, ती आता मोठमोठ्या कारखान्यात मोठमोठ्या यंत्रांबरोबर काम करीत आहेत. त्याच्या छोट्या गावातल्या छोट्या सामाजिक समजुती आणि रीती आता इथे लागू पडत नाहीत. आता आपल्या समाजात परिवर्तन घडतं आहे. पण तरीही फरक समजून घेतला पाहिजेच. यांत्रिकीकरणाने परिवर्तन अपरिहार्य होऊन लादलं जाणं आणि वैचारिक पातळीवर मेंदूतल्या खिडक्या उघडल्या जाणं, यात फरक असतो. मशीन चालवायला शिकता येतं तीन-चार महिन्यांत, पण बुद्धिवाद शतकांतूनसुद्धा अंगीकारता येत नाही. अर्थात, मनाची मशागत झाली आणि शिक्षणाचा प्रसार झाला, तर वैचारिक परिवर्तन अशक्य नाही.

: ५ :

आताचा जमाना कसा विचित्र आहे पाहा. बुद्धिवाद, सहिष्णुता आणि मानवी बंधुभाव प्राप्त करण्याचे म्हणून जे मार्ग सांगितले असतील, ते सगळे जुने झाले आहेत. मात्र हितसंबंधांचे नवे मार्ग निर्माण झाले आहेत. हे आर्थिक हितसंबंधांचे मार्ग आहेत. आता मजूरसुद्धा एकसंघ राहिलेला नाही. त्यांच्यातसुद्धा फूट पाडली जातेय. हेसुद्धा हितसंबंधांसाठीच.

शहरांचं पाहा. माणसं जास्त, घरं कमी. मग घर-मालकांची ‘चांदी’ होणारच. भाडेकरूंचं शोषण होणारच. भाडेकरूसुद्धा एक नव्या ‘वर्गात’ रूपांतरित झाले आहेत. खुद्द हिंदुस्थानात माणसांसाठी किती तरी दरवाजे बंद केले जातायत. हे दरवाजे घरांचे आहेत. मनाचेसुद्धा आहेत. म्हणजे मनाचा कोतेपणा, कर्मठपणा, उथळ मनोवृत्ती नव्याने- नव्या मार्गाने डोकं पुन्हा वर काढत आहेत. ही उथळ मनोवृत्ती कित्येक वर्षांनंतरसुद्धा प्रज्वलित होते आहे आणि आग लावायला सिद्ध होते आहे. जुने झगडे आणि विद्वेष यांच्यात वाढ होते आहे. हिंदू-मुस्लिम झगड्याबरोबर आता उत्तर-दक्षिणचे झगडे पण अस्तित्वात आलेत. हे सगळं स्वातंत्र्यानंतर त्वरितच घडतं आहे.

ही धोक्याची घंटाच आहे आणि उद्यासाठी सावध होण्याची सूचना. ती लक्षात घेऊनच आपल्या पंतप्रधानांनी- जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्या नेतृत्वाखाली ‘कौमी एकते’ची- नॅशनल इंटिग्रेशनची मोहीम चालवली. या वेळेची ही सर्वांत महत्त्वाची मोहीम मानली पाहिजे. या मोहिमेचा हेतू ‘हिंदू-मुस्लिम भाई-भाई’ या जुन्या भावनिक घोषणेचं पुनरुज्जीवन करणं हा नाही, तर मायनॉरिटीचा पाया नव्या राष्ट्रवादाशी जोडून घेणे हा आहे. पण अडचणी आहेत. या मोहिमेची सूत्रं कोणाच्या हातात गेली आहेत, पाहा. यापैकी थोडीच माणसं जवाहरलाल नेहरूंसारखा विचार करतात, उर्वरित म्होरक्यांचं आयुष्य समाजात ‘वर्गवाद’ निर्माण करण्यासाठी खर्ची पडलं आहे. ही मंडळी जवाहरलालांच्या या ‘इंटिग्रिटी’च्या मोहिमेची सूत्रं चालवत आहेत. म्हणून, ज्या लेखकांना जवाहरलालांच्या या मोहिमेचा अर्थ नीट समजला आहे, त्यांच्यावर जबाबदारी

येऊन पडते. या लेखकांनी या मोहिमेचा योग्य अर्थ समाजाला सादर करावयाचा आहे. कृष्ण चंदरचं हे नाटक ‘दरवाजे खोल दो-’ याच भूमिकेतलं पहिलं आणि महत्त्वाचं पाऊल आहे. ‘अंजुमन तरक्की उर्दू, मुंबई’ या संस्थेमार्फत हे नाटक मुंबईत मोठ्या उत्साहाने सादर होत राहिलं. हे नाट्यप्रयोग याच ‘राष्ट्रीय एकते’च्या संदर्भातल्या चळवळीचा भाग म्हणून सादर झाले आहेत.

लेखक म्हणून कृष्ण चंदरची ओळख करून देण्याची गरजच नाही. त्यांच्या कादंबऱ्या व कथा मागील वीस वर्षांपासून उर्दू अन् हिंदीतच नाही, तर जगातल्या अन्य भाषांमध्येसुद्धा प्रकाशित होत आहेत आणि लोकप्रियही झाल्या आहेत. कृष्ण चंदर ‘तरक्की-पसंद’- पुरोगामी असे लेखक आहेत, हे आता सर्वांना माहीत झालं आहे. मायनॉरिटीच्या जीवनमूल्यांचा त्यांना चांगला परिचय आहे. म्हणून ते जे लिहितात, त्या लेखनाचा पाया याच अल्पसंख्याकांच्या जीवनमूल्यांशी संबंधित असतो. पण इतकंच नाही- ते माणसावर प्रेम करतात, त्याच्या जगण्यावर प्रेम करतात. माणूसपणावर प्रेम करतात, माणुसकीवर प्रेम करतात. एखाद्या नाटककारासाठी हा गुण खूपच महत्त्वाचा ठरतो. असा नाटककार आपल्या पात्रांच्या भल्या-बुऱ्या स्वभावाचा चांगला जाणकार असतो. तो आपल्या पात्रांबरोबर हसतो आणि रडतोसुद्धा. याव्यतिरिक्त कृष्ण चंदरमध्ये आणखी दोन गुण दिसून आले. पहिला गुण हा की, नाटकातला सस्पेन्स प्रथमपासून अखेरपर्यंत कायम राहतो. दुसरा गुण असा की- नाटकातले संवाद धारदार, अर्थपूर्ण आणि पल्लेदार असे असतात. एक-एक संवाद म्हणजे फुलझडीच. पण ही आतषबाजी केवळ नेत्रदीपक, श्रवणमधुरच असते असं नाही. हे शब्द, त्यातले अर्थ मनाच्या आणि मेंदूच्या गाभाऱ्यात प्रवेश करतात- विचार करायला लावतात, हे मोठंच सामर्थ्य आहे. नाटककाराची अर्थपूर्णता आहे. त्याचं यश आहे. कृष्ण चंदरसारख्या पुरोगामी लेखकाने ‘कौमी एकता’सारखा विषय निवडला, यशस्वीपणे हाताळला, हे आपलं चांगलं नशीबच म्हटलं पाहिजे. या नाटकात द्रष्टेपणा आहे. ‘दूरचा इशारा’ही आहे.

‘दरवाजे खोल दे’ हे शीर्षक बोलकं तर आहेत, पण सूचकही आहे. राजकीय व भावनिक भाष्यांपासून, विषयांपासून वेगळं होऊन हे नाटक माणुसकीबाबत आणि मायनॉरिटीच्या समस्यांबाबत खुबीने बोलतं. कृष्ण चंदर लेक्चर देत नाहीत, भाषण आणि सल्ले देत नाहीत. भ्रमाच्या व समजुतीच्या वजनदार फुग्याला फक्त टाचणी टोचतात आणि फुग्यातील हवा काढून घेतात.

हिंदुस्थानात ‘कौमी एकता’ यशस्वी होत नाही याचं कारण मानसिक कोतेपणात- नॅरो माइंडेडनेसमध्ये शोधलं पाहिजे, असं कृष्ण चंदर यांनी नाटकातून सुचवलं आहे. आमच्या कल्पना, मान्यता, धारणा, समज-अपसमज, व्यर्थ अभिमानाचा बुरखा या सगळ्यांचा परामर्श घेऊन कृष्ण चंदर यांनी लोक-समजुतीचे पितळ उघडे केले आहे आणि म्हणून हे ऐतिहासिक कार्य कृष्ण चंदरच्या नावे नोंदवले जाईल.

आता वेळ आली आहे. आता सांगितलं पाहिजे की, ‘दरवाजे खोल दोऽ’- उघडा, दारं उघडा आता. मुसलमानांसाठी, मांस खाणाऱ्या हिंदूंसाठी, मद्रासी-बंगाल्यांसाठी जे दरवाजे बंद होते- मनाचे दरवाजे- ते उघडण्याची वेळ आली आहे. त्याशिवाय एकात्मता कशी साधणार? सगळे ‘हम वतन’ आपलेच तर आहेत. मनाचे आणि बुद्धीचे दरवाजे आता उघडावे लागतील. कृष्ण चंदरनी हे नाटक लिहून गंजलेल्या आणि करकरणाऱ्या जुन्या बंदिस्त दारांना हात लावला आहे. हे दरवाजे उघडले पाहिजेत!

पत्रकार, लेखक आणि दिग्दर्शक अशी ओळख असलेल्या ख्वाजा अहमद अब्बास (१९१४-८७) यांचे उर्दू, हिंदी आणि इंग्रजी या तीनही भाषांवर प्रभुत्व होते. त्यांनी आपल्या ७२ वर्षांच्या आयुष्यात एकूण ७४ पुस्तके लिहिली. त्यात ९० लघुकथा आणि ३००० लेख आहेत. सोबतच ४० चित्रपटांचे पटकथा लेखन वा दिग्दर्शनही केले. स्वतःला संवादक म्हणवून घेणे त्यांना आवडायचे. ‘समाजात सकारात्मक बदल घडवणे आणि मनुष्यातील मानवता जागवणे’ या एकाच ध्येयाने ते प्रेरित झाले होते. १९३५ मध्ये बॉम्बे क्रॉनिकलमध्ये सुरू झालेला ‘लास्ट पेज’ हा त्यांचा साप्ताहिक स्तंभ पुढे ब्लिट्झ पत्रिकेत प्रकाशित होऊ लागला. हा स्तंभ त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे तब्बल चाळीस वर्षे अखंडपणे प्रकाशित होत असे. कृष्ण चंदर यांच्या ‘अन्नदाता’ या कादंबरीचे कथानक असलेला ‘धरती के लाल’ हा हिंदी चित्रपट अब्बास यांनी दिग्दर्शित केला होता.

चिंतन

# सक्तीने एकत्रीकरण करणारे लोक 'पागलखाने' निर्माण करतील!

कृष्ण चंदर
अनुवाद : भारत सासणे

आजचा आपला हिंदुस्थान म्हणजे छोटी पृथ्वीच आहे. किती वंश, किती रंग, किती धर्म, किती संस्कृती आहेत इथे! या सर्वांना एकत्र, एका माळेमध्ये गुंफावे लागेल. हे काम जुलूम-जबरदस्तीने, आग्रही वेडेपणाने, शक्तिप्रदर्शनाने होणारच नाही. देश निधर्मी असला पाहिजे आणि तोच एक मार्ग आहे एकत्र राहण्याचा. देश कोण्या एका धर्माचा नसावा, राज्य कोण्या एका धर्माचं नसावं- हे लक्षात घेणं महत्त्वाचं आहे. अशा देशाचे दरवाजे सर्वांसाठी उघडे पाहिजेत. विविध वंशीयांच्या व अल्पसंख्याकांच्या भाषांना, त्यांच्या जीवनपद्धतींना आणि त्यांच्या वैविध्यपूर्ण संस्कृतींना योग्य अशी जागा या नव्या राष्ट्रात देण्यात यावी; मगच एकात्मता आकाराला येईल. अल्पसंख्याकांना फुलू दिलं पाहिजे. त्यांना प्रगती करता येईल, असं वातावरण निर्माण केलं पाहिजे. त्यांना तशी संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. यातूनच हिंदुस्थानचं सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवन सुदृढ आणि निरोगी राहील.

आपल्या देशात किती तरी धर्म अस्तित्वात आहेत. किती रंग, किती रूपं, किती संप्रदाय, किती चाली-रीती! या विविधतेचा आणि भेदांचा परकीयांनी पुरेसा फायदा करून घेतला आहे. पुढेसुद्धा फायदा घेणारच नाहीत याचा भरवसा नाही. म्हणून, या देशात 'कौमी एकते'ची फार आवश्यकता आहे.

आपल्या देशात राष्ट्रीय एकात्मतेसाठी यापूर्वीसुद्धा मोहिमा हाती घेण्यात आल्या होत्या. सम्राट अशोकाच्या वेळेला एक चळवळ चालविली गेली, एकात्मतेसाठी. दुसरी, अकबराच्या वेळेला. तिसरी आता जवाहरलाल नेहरूंच्या वेळेस सुरू होते आहे. पहिल्या दोन चळवळी इतिहासजमा आहेत, दूरच्या भूतकाळातल्या आहेत. तिसरी आता चालू असलेली कौमी एकतेची चळवळ. ती यशस्वी झाली, तर आत्ताचीच नाही तर येणारी पिढीसुद्धा लाभान्वित होणार आहे. म्हणून या सद्य मोहिमेचे महत्त्व आहे. या चालू मोहिमेचे मूल्यमापन करावे लागेल, मागील दोन चळवळींच्या प्रकाशात! इतिहासजमा झालेल्या दोन चळवळींची वैशिष्ट्ये काय होती आणि त्यांचे दोष काय होते, हे पाहावे लागेल. हे सोपं काम नाही, कारण या मोहिमेवर विचार करणारे लोक वेगवेगळी मते बाळगताना दिसतात.

सम्राट अशोक आणि अकबर दोघांनी या देशात लष्करी

बळाचा वापर करून 'राष्ट्रीय एकता' आणण्याचा प्रयत्न केला. पण अशोकाने कलिंग युद्धानंतर आणि अकबराने हळदीघाटीनंतर आपली धोरणं बदलली आहेत. त्यांच्या लक्षात आलं की, मनाच्या जोडणीवर लष्करी शक्तीचा वापर परिणामकारक सिद्ध होत नसतो. त्यांच्या लक्षात आलं की– माणसं वाकतात–मोडतात, पण त्यांची मनं बदलतं नाहीत. असंही लक्षात आलं की– माणसांना बदलायचं असेल तर, वापरायची धोरणं आणि साधनं बदलावी लागतील. ज्यांनी बळाच्या साह्याने 'राष्ट्रीय एकता' आणण्याचा प्रयत्न केला, त्यांना आपली मतं, आपली धोरणं बदलावी लागलेली आहेत. बळाच्या चुकीच्या वापराचं दुसरं नाव 'जुलूम' असं आहे. जुलमाचा संबंध आणि एकरूपता कबरस्तानाशी जोडली जाते, जीवनाशी नाही. जीवनातले रंग, फुलणारे बहर आणि सृजन याच्याशी जुलमाचा संबंध जोडला जात नसतो. बिस्मार्कने जर्मनीला एकत्र जोडण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाही. कारण त्याची पॉलिसी पोलादी अशी आणि बळावर आधारलेली होती. हिटलरने सगळ्या जगाला रक्ताने न्हाऊ घातले. रानटी आणि क्रूर अशी धोरणे त्याने राबविली. सात लाख ज्यूंच्या हत्येनंतरही जर्मनीचं भवितव्य बदलले नाही, कारण ते बदलणारे नव्हतेच. आता जर्मनीच्या विभाजनाची चर्चा ऐकू येतेय. जे देशोधडीला लागले त्यांनी मात्र 'इस्राईल'ची स्थापना केली– स्वतंत्र सृजन केले.

म्हणून या देशात जोर–जबरदस्तीचा वापर करून शक्तिप्रयोग करून, दुराग्रह राबवून जी मंडळी 'राष्ट्रीय एकात्मता' आणण्याचा विचार करत असतील; ती मंडळी 'एकात्मते'ची शत्रू आहेत, असं म्हणावं लागेल. आपल्या आदर्शवादी विचारांचे ते स्वत:च शत्रू बनून जातात.

या देशात पाच करोडच्या जवळपास मुसलमान राहतात. एक करोडच्या जवळपास ख्रिश्चन. तितकेच शीख, बौद्ध, जैन, यहुदी. तितकेच अन्य. यावर शक्तीचा आणि सक्तीचा बुलडोझर चालवून त्यांना कसे एक करणार? हे दगड–धोंडे वाटले का? प्रेमाच्या जादूनेच ते एकमेकांजवळ येऊ शकतात आणि त्याव्यतिरिक्त दुसरा कोणताच मार्ग उपलब्ध नाही.

मुघल सेना शिखांचा पराभव करू शकली नाही, शिखांची त्या वेळची संख्या कमी असतानाही. प्रचंड शक्ती असताना मराठ्यांना काबूत करता आलं नाही. आता तर आधुनिक काळ आला आहे. लोकसंख्याही वाढली आहे.

या देशात जोर–जबरदस्तीचा वापर करून शक्तिप्रयोग करून, दुराग्रह राबवून जी मंडळी 'राष्ट्रीय एकात्मता' आणण्याचा विचार करत असतील; ती मंडळी 'एकात्मते'ची शत्रू आहेत, असं म्हणावं लागेल. आपल्या आदर्शवादी विचारांचे ते स्वत:च शत्रू बनून जातात.
या देशात पाच करोडच्या जवळपास मुसलमान राहतात. एक करोडच्या जवळपास ख्रिश्चन. तितकेच शीख, बौद्ध, जैन, यहुदी. तितकेच अन्य. यावर शक्तीचा आणि सक्तीचा बुलडोझर चालवून त्यांना कसे एक करणार? हे दगड–धोंडे वाटले का? प्रेमाच्या जादूनेच ते एकमेकांजवळ येऊ शकतात आणि त्याव्यतिरिक्त दुसरा कोणताच मार्ग उपलब्ध नाही. मुघल सेना शिखांचा पराभव करू शकली नाही, शिखांची त्या वेळची संख्या कमी असतानाही. प्रचंड शक्ती असताना मराठ्यांना काबूत करता आलं नाही. आता तर आधुनिक काळ आला आहे. लोकसंख्याही वाढली आहे. आता बदलत्या परिस्थितीत शक्तिसामर्थ्याचा वापर करून 'कौमी एकता' आणणं कसं शक्य होणार आहे? जी मंडळी सक्तीने एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न करतील, ती भोवताली 'पागलखाना' निर्माण करतील, हे नक्की.


कृष्ण चंदर

आता बदलत्या परिस्थितीत शक्तिसामर्थ्याचा वापर करून 'कौमी एकता' आणणं कसं शक्य होणार आहे? जी मंडळी सक्तीने एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न करतील, ती भोवताली 'पागलखाना' निर्माण करतील, हे नक्की.

अशोकाने बौद्धमत स्वीकारले. त्याआधारे त्याने कौमी एकतेची पायाभरणी केली. अकबराने नवा धर्म स्थापन केला- 'दीन-ए-इलाही'. यामार्फत हिंदू-मुलमानांना धार्मिक कारणांसाठी एकत्र आणण्याचा त्याने प्रयत्न केला. पण एका धर्माच्या आधारे सर्वांना एकत्र आणणं त्याही वेळेस अशक्य झालं आणि आज तर ते मुळीच शक्य नाही. एका मुसलमान मित्राने म्हटलं की- त्याच वेळेस सगळा हिंदुस्थान मुसलमान झाला असता, तर पाकिस्तान बनलाच नसता! हिंदूंचं हेच म्हणणं आहे, उलट्या पद्धतीने. जर सगळा देश हिंदू झाला, सगळ्या रीतिभाती हिंदू पद्धतीने पाळल्या गेल्या; तर कौमी एकतेचा प्रश्न मिनिटात सुटेल!

पण हा काही मिनिटांचा 'मसला' नाहीच. या देशावर मुसलमानांची सत्ता आठशे वर्षं राहिली आहे. अधिकार, धर्मसत्ता इत्यादी सर्व मार्ग उपलब्ध असतानाही मुसलमानांची संख्या दहा कोटींपेक्षा जास्त वाढू शकली नाही. आणि आज या देशात हिंदूंची संख्या तीस कोटींपेक्षा जास्त आहे. या तीस कोटी हिंदूंवर इस्लाम लादण्यासाठी किती आठशे वर्षं लागतील, याचा हिशेब करावा लागेल. आज मुसलमानांकडे पूर्वी होती तशी कथित शक्ती नाही, लष्कर नाही, सामर्थ्य नाही. त्यामुळे बळाच्या साह्याने ते इस्लाम लादू शकत नाहीत. हिंदू मित्रांचं म्हणणं त्या उलट असतं. त्यांच्यासमोर तीस कोटी ही संख्याच फक्त असते. पण हे सगळे एकत्र, एकजिनसी, एक विचारांचे आहेत का? त्यांच्यात आपसात भेदभाव आहेत, मतभेद आहेत. जी (हिंदू) मंडळी आपल्याच बांधवांना दूर ढकलतात, ती राष्ट्रीय एकात्मता कशी साधू शकतील? अडचण ही आहे. पण दोन्ही बाजूंनी पक्ष मांडला जातोय, हे मात्र खरे. वास्तव असे आहे की, 'कौमी एकते'चा आणि धर्माचा काही संबंधच नाही. धर्माच्या नावावर राष्ट्रीय एकतेचे सूत्र सांगणे म्हणजे जनतेची फसवणूकच. या देशात मतभेदांचं भांडवल करणं आणि द्वेषाला विस्तारत नेणं अगदी घातक असंच असणार आहे.

ज्या देशात दहा धर्म आणि पंधरा भाषा असतील, त्यापेक्षा जास्त संप्रदाय असतील, त्यापेक्षा जास्त चाली-रीती असतील आणि या चाली-रीती सुंदर असतील, आध्यात्मिक पण असतील, शेकडो वर्षांच्या परंपरा व संस्कृती (कल्चर)ने बद्ध अशा असतील, देशाला प्राचीनत्वाचा वारसा मिळालेला असेल, इतिहास व वाङ्मयाचा प्रवाह अखंड वाहता असेल; त्या देशाच्या एकात्मतेबद्दल आपल्याला बोलायचं आहे. अनेकांनी या देशाला समृद्ध बनवलं आहे. मदुरेचं मंदिर ज्यांनी बनवलं, वेरूळचं शिल्प आणि अजिंठ्याची चित्रं ज्यांनी बनवली, ताजमहलचे घुमट ज्यांनी साकार केले, प्राचीन चर्च आणि गुरुद्वारा ज्यांनी बनवले, अबूची सुंदर मंदिरं अन् सांची व सारनाथचे स्तूप ज्यांनी बांधले-घडवले; त्यांनी 'विविधतेतली एकता' प्रवाहित केली आहे. या ठिकाणांहून एका धर्माचा, एकाच विचाराचा दिवा कसा पेटता राहील? पण राजकारण? या मंडळींना कोण सांगणार? ही मंडळी या देशाला द्वेषातून, नफरतीच्या प्रोत्साहनातून आत्मघातकी परिस्थितीत लोटत आहेत.

मग आता प्रश्न असा उपस्थित होतो की, अशा विविधतेतून राष्ट्रीय एकात्मतेचं स्वरूप कसं असेल? उघडच दिसतं की, या एकात्मतेत विविधता असणार आहे. एक भाषा, एका धर्माचं वर्चस्व, विशिष्ट वर्ग किंवा जातीचं वर्चस्व इथे या एकात्मतेत असणार नाही. कॅनडात इंग्रज आणि फ्रेंच एकत्र राहत आले आहेत. दोन्ही भाषा बोलल्या जातात समाजात. दोघेही 'कॅनेडियन' समजतात स्वत:ला. त्याचा अभिमान बाळगतात. आपापल्या भाषांवर प्रेम करतात आणि देशावर प्रेम करतात, प्राण देण्याची तयारी ठेवतात. रशियात वीसपेक्षा जास्त भाषा आहेत आणि तितकीच राज्यं आहेत, वंश आहेत, विविधता आहे. रंगारंग असं समाजजीवन आहे. असं असतानाही तिथे राष्ट्रीय एकता आहे, युनिटी आहे. हे सद्य काळातलं एक उदाहरण!

आम्ही नुकतेच स्वतंत्र झालोत. आपण या देशातल्या एकात्मतेचा अभ्यास केला पाहिजे. ही उदाहरणे नजरेसमोर ठेवली पाहिजेत. आजचा आपला हिंदुस्थान म्हणजे छोटी पृथ्वीच आहे. किती वंश, किती रंग, किती धर्म, किती संस्कृती आहेत इथे! या सर्वांना एकत्र, एका माळेमध्ये गुंफावे लागेल. हे काम जुलूम-जबरदस्तीने, आग्रही वेडेपणाने, शक्तिप्रदर्शनाने होणारच नाही. देश निधर्मी असला पाहिजे आणि तोच एक मार्ग आहे एकत्र राहण्याचा. देश कोण्या एका धर्माचा नसावा, राज्य कोण्या एका धर्माचं नसावं- हे लक्षात घेणं महत्त्वाचं आहे. अशा देशाचे दरवाजे सर्वांसाठी उघडे पाहिजेत. विविध वंशीयांच्या व

अल्पसंख्याकांच्या भाषांना, त्यांच्या जीवनपद्धतींना आणि त्यांच्या वैविध्यपूर्ण संस्कृतींना योग्य अशी जागा या नव्या राष्ट्रात देण्यात यावी; मगच एकात्मता आकाराला येईल. अल्पसंख्याकांना फुलू दिलं पाहिजे. त्यांना प्रगती करता येईल, असं वातावरण निर्माण केलं पाहिजे. त्यांना तशी संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. यातूनच हिंदुस्थानचं सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवन सुदृढ आणि निरोगी राहील. अल्पसंख्याकांना समान दर्जाही मिळेल. पण हे काम कसरत करण्यासारखं राहील. अवघड आणि मुश्कील असं. संकुचित दृष्टिकोन न बाळगता, मनाचा कोतेपणा आड न येऊ देता, राजकीय-पक्षीय स्वार्थ बाजूला ठेवून, आग्रहाचे चष्मे उतरून ठेवूनच हे अवघड काम करता येईल. 'छोट्या दिला'ने घेतलेले निर्णय छोट्या राष्ट्राला निर्मित करतील. मोठ्या राष्ट्रनिर्मितीसाठी 'मोठं हृदय'- 'बडा दिल' आपल्याकडे असायला हवा.

खोलात जाऊन बघितलं तर या देशात एक अंतर्गत अशी एकात्मता आहेच. ही खोल अशी भावना सामान्यांच्या हृदयात वसलेली असते. मतभेदाची वरवरची खळबळ- वरवरचा गोंधळ सोडला, तर अंतस्थ असा समुद्र या जनसामान्यांच्या हृदयात खोलपर्यंत पसरलेला असतो. तुम्ही बंगाली किंवा मल्याळी असाल, पण तुम्ही हिंदुस्थानी आहात- ही भावना खोल समुद्रासारखी आहे. तुम्ही हिंदू किंवा मुसलमान असाल, पण तुम्ही हिंदुस्थानी आहात- ही जाणीव आश्वासक. तुम्ही तमिळ आणि मराठी बोलाल, पण तुम्ही हिंदुस्थानी आहात. नृत्य-गायनादी प्रकारांत तुम्ही व्यक्त व्हाल. लावणी गाल, भांगडा नाचाल, पण तुम्ही हिंदुस्थानी आहात. आणि ही जाणीव- हा 'एहसास' आतून येतो, तो समुद्रासारखा खोल आहे. ही जाणीव मोठी आश्वासक आहे. या सगळ्या सौंदर्याचा एकत्रित आविष्कार म्हणजे हिंदुस्थान आहे. हिंदुस्थान म्हणजे दिल्लीच नाही, तर मद्रास पण आहे. मदुराईचं मंदिर म्हणजे हिंदुस्थान नाही, तर दिल्लीतील जामा मशीदसुद्धा आहे. धृपदच नाही, तर खयाल पण आहे. महाकवी कालिदासच, नाही तर गालिब पण आहे. कबीर पण आहे, टागोर पण आहे. ही जाणीव हिंदुस्थानच्या जनतेच्या मनाच्या कोपऱ्यात अस्तित्वात आहे!

ही जाणीव मजबूत केली पाहिजे. सर्वच घटक, सर्व नागरिक, त्यांचे प्रदेश, त्यांच्या भाषा आणि कल्चर यामध्ये समान धागा शोधला पाहिजे. एक धागा गरिबीचा आहे, भाकरीचा आहे. बेरोजगारी आणि बिमारीचा आहे. या समस्येवर तोडगा म्हणजे परस्परद्वेष नाही. एकमेकांशी भांडणे हाही तोडगा नाही. गरिबी आणि विषमता भांडणाने-द्वेषाने दूर होणार नाही. यासाठी समृद्धीप्राप्ती हाच उपाय आहे. जास्त दौलत निर्माण करावी लागणार आहे, आणि हे काम एकत्र येऊनच होऊ शकते.

सर्वांनी एकत्रितपणे धनसंपदा, समृद्धी निर्माण करावी लागेल. अर्थात, या संपत्तीवर, उपभोगावर आणि विनियोगाच्या हक्कावर सर्वांचा समान हक्कही असावा लागेल. विषमता संपवावी लागेल. काळा-गोरा, स्त्री-पुरुष, हिंदू-मुसलमान असा काही भेद करता येणार नाही. समृद्धीचा माग सर्वांसाठी अबाधित ठेवावा लागेल. सुंदर असं जगणं उपलब्ध करावं लागेल. हरिजनाला मान खाली घालावी लागणार नाही. व्यर्थ अहंकारही पोसले जाणार नाहीत. जीवनमूल्ये सुंदर असतील, मौल्यवान असतील. सर्वांना उपलब्ध असतील. भारतीयत्वाचा हिंदुस्थानी असण्याचा समान धागा घट्ट करून जनतेच्या हृदयात जाणीव प्रसारित करावी लागेल. तरच, 'कौमी एकता'- राष्ट्रीय ऐक्य शक्य आहे. हे काम आपण सर्वांनी मिळून करायचं आहे!

'प्रगतिशील लेखक संघ' नावारूपाला आणण्यात ज्या लेखकांचा सहभाग होता, त्यात एक नाव कृष्ण चंदर यांचेही होते. त्यांना वगळून प्रगतिशील लेखक संघाच्या कार्याबद्दल बोलताच येणार नाही.
उर्दू भाषेला- विशेषतः उर्दू कथेला- एका उंचीवर नेण्यात त्यांचे योगदान फार मोठे आहे. त्यांनी भरपूर लिहिले. हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषांमधून सारख्याच अधिकाराने लिहिले.
त्यांच्या आयुष्यावर प्रगतिशील साहित्याचा फार मोठा प्रभाव पडलेला आपल्याला दिसतो. प्रगतिशील लेखक संघाने त्यांच्या लेखनाला एक नवी दिशा दाखवली. त्या रस्त्यावर ते मरेपर्यंत चालत राहिले. त्यांच्या बहुतेक कथा समाजवादाने प्रेरित आहेत. त्यांनी आपल्या लेखणीद्वारे दीन-दुबळ्यांचे दुःख, पराजय, आशा-आकांक्षा यांचेच चित्रण केले. सांप्रदायिकता आणि धार्मिक कट्टरता यांवर नेहमीच प्रहार केला.

चिंतन

# आपण आता ‘भ्रमयुगात’ प्रवेश केला आहे!

**भारत सासणे**

मी मराठीतला लेखक आहे किंवा माजी जिल्हाधिकारी आहे वगैरे परिचय मी दिला नव्हता. ज्ञानापुढे नम्र होण्याचा माझा प्रयत्न राहिला. माझी गती पाहून माझ्या गुरुजींनी मला ‘इंदिरा गांधी ओपन युनिव्हर्सिटी’च्या उर्दू भाषेच्या दोन परीक्षा द्यायला लावल्या. मी त्या उत्तीर्ण झालो. आता मी उर्दू भाषेचा ‘डिप्लोमा होल्डर’ आहे. त्याच सुमाराला गुरुजींनी मला हे नाटक वाचायला दिलं होतं. ते वाचायचे राहून गेले होते. ‘कोरोना’काळात हे नाटक हाती लागलं. पुन्हा आता आत्मविश्वासही होता, म्हणून हे नाटक वाचलं. सन एकोणीसशे चौसष्टमध्ये लिहिलेलं नाटक सन दोन हजार वीसमध्येसुद्धा अगदी प्रस्तुत आहे, लागू पडतं आहे, हे पाहून मी चकित होत राहिलो. भोवती आज जे घडतं आहे, त्याबद्दलची चर्चा साठ वर्षांपूर्वीच्या नाटकात केली तर आहेच; पण दिशादर्शन पण केलंय, तोडगाही सांगितलाय, हे पाहून मी आणखीनच चकित झालो. या नाटकाचा मराठी अनुवाद केला पाहिजे, असे मला वाटू लागले. मग अल्पावधीत थेट उर्दूतून मराठीत हा अनुवाद उतरून आला.

: १ :

सन एकोणीसशे तीसच्या आधीपासूनच उर्दू साहित्यविश्वामध्ये ‘तरक्की पसंद तहरीक’ची सुरुवात झाली. पुरोगामी विचारांचे लेखक या चळवळीशी जोडले गेल्याचे दिसून येते. उर्दूतले पहिल्या फळीचे, महत्त्वाचे आणि मौलिक लिखाण करणारे लेखक या चळवळीचा हिस्सा होते. मुन्शी प्रेमचंद हे यातले एक उदाहरण. याच मालिकेतले महत्त्वाचे नाव कृष्ण चंदर यांचे आहे. के. ए. अब्बास यांनी त्यांच्या चिंतनात हा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहेच. पीडित, शोषित आणि वंचित अशा तळागाळातल्या उपेक्षित माणसाचा क्षीण आवाज समाजात बुलंद करणे ही या चळवळीची भूमिका. मंटो, राजेंद्रसिंह बेदी, इस्मत चुगताई आदी नावेसुद्धा याच चळवळीशी जोडलेली. कृष्ण चंदरचे हे नाटक ‘कौमी एकते’च्या चळवळीचा एक भाग म्हणून लिहिले आणि सादर केले गेले. नाट्यलेखनाचा हेतू ‘सामाजिक – राष्ट्रीय एकते’चा प्रचार करणे हा असला, तरी मानवी मूल्यांबाबतचे भाष्य महत्त्वाचे. ‘दरवाजे खोल दो’ हे नाटक सन एकोणीसशे चौसष्टमध्ये लिहिले गेले. याच सुमारास या नाटकाचे प्रयोग मंचावर सादर झाले आणि ‘नभोनाट्या’च्या स्वरूपातदेखील सादर होत राहिले. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ‘कौमी एकते’ची चळवळ

घोषित केली होती. कृष्ण चंदर या चळवळीत नाट्यलेखन माध्यमातून सक्रिय झाले. त्या निमित्ताने आणि त्या अनुषंगाने, काळाच्या पुढे पाहणारे, द्रष्टे असे एक नाटक आपल्याला उपलब्ध झाले.

: २ :

ज्या काळात कलाकृती लिहिली जाते, त्या काळाबद्दल बोलत असतानाच ती कलाकृती येणाऱ्या काळाबद्दलही सूचन करीत असेल, तर ती कालजयी मानली जाते. कालजयी कृतीत दोष नसतात असे नाही; पण जो कथित संदेश आणि सूचन यांचे वहन ही कलाकृती करते, त्या संदेशामुळे ती कृती श्रेष्ठदेखील मानावी लागते. व्यापक असा करुणाभाव, मनुष्यजातीच्या अस्तित्वाबद्दलची आस्था व एकतेची वाटणारी निकड यामुळे 'दरवाजे खोल दो' हे 'प्रचारकी नाटक'सुद्धा श्रेष्ठ आणि कालजयी होऊन जाते.

स्वातंत्र्य नुकतेच मिळाले होते. 'कौमी एकते'ची- राष्ट्रीय एकात्मतेची हाक देण्यात आली होती. समाजातल्या प्रस्थापितांचे प्रातिनिधिक विचार विषाक्त पद्धतीने प्रसृत होत होते. अशा परिस्थितीत, लेखकाची जबाबदारी म्हणून हे नाटक लिहिले गेले. सामाजिक प्रश्नांना कलाकृतीने अंतिम असे उत्तर द्यायचे नसते, याचे भान असतानासुद्धा कृष्ण चंदर यांनी या नाटकातून संदेश आणि 'सोल्युशन' दिलेले आहे. उत्तर देण्याचे टाळण्यापेक्षा उत्तर सुचवून 'अडकणे' जास्त योग्य. कृष्ण चंदर यांनी हा धोका पत्करला आहे.

: ३ :

मी उर्दू शिकायला सुरुवात केली, तेव्हा माझे शिक्षक श्री. अतिक शेख यांच्या वर्गात मी जाऊन बसत असे. वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या वयोगटांतले स्त्री-पुरुष तिथे एकत्रितपणे उर्दू शिकायला येत. काही पत्रकार, काही गायक आणि परफॉर्मिंग आर्टशी संबंधित व्यक्ती तिथे आलेल्या असत. कोणाला उच्चार सुधारून घ्यायचे होते, कोणाला शायरीत रस होता, तर अनेकांना केवळ कुतूहल होतं. माझा उद्देश वेगळा होता. ऐकून आणि थोडं बोलून मला थोडं उर्दू येत होतं, पण मला व्यासंग वाढवायचा होता. उर्दू लिपी वाचता येऊन त्या लिपीमधूनच थेट उर्दू साहित्याचं वाचन करावं, उर्दू लिपी लिहिता यावी आणि या समृद्ध भाषेचा थेट परिचय व्हावा, असा माझा उद्देश होता. मी तिथे 'अलीफ-बे-पे...' गिरवायला लागलो. मी मराठीतला लेखक आहे किंवा माजी जिल्हाधिकारी आहे वगैरे परिचय मी दिला नव्हता. ज्ञानापुढे नम्र होण्याचा माझा प्रयत्न राहिला.

माझी गती पाहून माझ्या गुरुजींनी मला 'इंदिरा गांधी ओपन युनिव्हर्सिटी'च्या उर्दू भाषेच्या दोन परीक्षा द्यायला लावल्या. मी त्या उत्तीर्ण झालो. आता मी उर्दू भाषेचा 'डिप्लोमा होल्डर' आहे. त्याच सुमाराला गुरुजींनी मला हे नाटक वाचायला दिलं होतं. ते वाचायचं राहून गेलं होतं. 'कोरोना'काळात हे नाटक हाती लागलं. पुन्हा आता आत्मविश्वासही होता, म्हणून हे नाटक वाचलं. सन एकोणीसशे चौसष्टमध्ये लिहिलेलं नाटक सन दोन हजार वीसमध्येसुद्धा अगदी प्रस्तुत आहे, लागू पडतं आहे, हे पाहून मी चकित होत राहिलो. भोवती आज जे घडतं आहे, त्याबद्दलची चर्चा साठ वर्षांपूर्वीच्या नाटकात केली तर आहेच; पण दिशादर्शन पण केलंय, तोडगाही सांगितलाय, हे पाहून मी आणखीनच चकित झालो. या नाटकाचा मराठी अनुवाद केला पाहिजे, असं मला वाटू लागले. मग अल्पावधीत थेट उर्दूतून मराठीत हा अनुवाद उतरून आला. जी दोन चिंतनं या नाटकाच्या अखेरीस जोडलेली आहेत, त्यांचाही अनुवाद मी केला. आपल्या सगळ्यांसाठी ही



सगळी सामग्री आज प्रस्तुत, उपयुक्त, महत्त्वाची व दखलपात्र अशी आहे.

: ४ :

'कौमी एकता' हा नंतर केवळ सरकारी कार्यक्रम होऊन गेला, तरी एकोणीसशे बासष्टच्या सुमारास ती हार्दिक अशी एक हाक होती. विशिष्टांची प्रातिनिधिक मानसिकता काय आहे, रुग्णावस्था काय आहे; हे नेमकं सांगून त्यावरचा इलाज काय आहे, हे पण सांगण्याची गरज होती. कृष्ण चंदर यांनी ढोबळ प्रतीकांमधून ही समस्या सोप्या पद्धतीने मांडली. आजसुद्धा 'सबका साथ- सबका विकास- सबका विश्वास' ही अधिकृत घोषणा होते, तेव्हा 'सब' म्हणजे कोण, हा प्रश्न उपस्थित होतोच. म्हणजे 'आम्ही' तर आहोतच, पण 'तुम्ही'ही आहात- असा अर्थ सूचित करायचा असतो. त्यातून द्वंद्व अधोरेखित होतं. 'तुम्ही' म्हणून जे कोणी आहेत, ते 'आपल्यातच' समाविष्ट आहेत, हे नाटकातून सांगितलंय. या देशाचा सर्वांनी एकत्रितपणे विकास करायचा आहे, हे साठ वर्षांपूर्वी लिहिलेल्या नाटकात नेमकेपणाने नोंदवलं आहे, हे विशेष.

नाटकाचं कथानक इथे सांगण्याचं प्रयोजन नाही, कारण आतापर्यंत तुम्ही नाटक वाचलेलं आहे. 'कमलकुंज' हे प्रतीक आहे. ही नवी इमारत म्हणजे हा नवा, स्वतंत्र झालेला देश आहे. (कमलकुंज हे नाव कसं सुचलं असावं?) पंडित रामदयाळ स्वत:ला या इमारतीचा मालक समजतो आहे; त्यामुळे 'इतरांनी' इथे राहू नये, ही त्याची भूमिका. ही इमारत (देश) उभी करण्यात सर्वांचे योगदान आहे, सर्वांचे हात लागले आहेत. त्यामुळे सर्वांनी इथे राहावे, मनाचे दरवाजे आणि मेंदूच्या खिडक्या उघडाव्यात- अशा 'टोन'वर नाटक संपतं. आज हे 'सोल्युशन' सोपं, प्राथमिक आणि बाळबोध वाटण्याची शक्यता आहे. कारण आज सन दोन हजार वीसमध्ये जगणं गुंतागुंतीचं झालं आहे आणि समस्या जटिल झाल्या आहेत. पण जटिल समस्येचं उत्तर सोपंही असू शकतं.

नाटक लिहिलं त्या वेळच्या समस्या वेगळ्या होत्या. पाकिस्तान नुकताच अस्तित्वात आला होता. जखम ताजी होती. आता पुन्हा विभाजनवाद कोणाला नकोच असणार. पण नाटकात हरिजनाच्या तोंडचे संवाद सावध करतात. (हरिजन हा शब्द आता बाद झाला आहे.) अपमान झाल्यानंतर आपण 'वेगळी, स्वतंत्र आणि जास्त उंच' इमारत बांधणार आहोत, असा इशारा हा धार्मिक आणि सात्त्विक प्रवृत्तीचा हरिजन व्यक्त करतो. नंतरच्या कालौघात आपण 'खलिस्तान'ची चळवळ पाहिलीच.

मिर्झाचा मित्र घर भाड्याने घेण्यासाठी येतो, पण त्याची लखनौची उर्दू भाषा पाहून त्याला खाण्या-पिण्याच्या अनेक अटी घालून पंडित रामदयाळ त्याला जवळजवळ नाकारतोच. पण या मित्राने स्वत:च घर नाकारलेलं आहे. इतक्या अटी असतील, तर मलाच इथे राहायचं नाही आणि तुमच्या दांभिकतेवर 'हिप्पोक्रसी'बद्दल बोललंही पाहिजे- असं तो ठणकावतो. आज परिस्थिती अशी आहे की, कोणत्याच विषयाबाबत सार्वत्रिक टीका-टिपणी करण्यात येत नाही. एक सार्वत्रिक मौन आणि स्वार्थी प्रशंसा भरून राहिला आहे. ढोंगबाजीवर प्रहार केला पाहिजे, हा इशारा आपल्याला सावध करतो, सजग करतो. विधायक टीकेची गरज हा नाटककार त्याच वेळेस अधोरेखित करतो आहे.

नाटकाची सुरुवात मुसलमानांना घर नाकारण्यापासून होते. पण नंतर हळूहळू 'बहुजन इतरेजनां'बाबतचीसुद्धा 'हेट स्टोरी' व्यक्त व्हायला लागते. त्याची कारणं वरवरची असतात. 'तुम्ही हिंदू आहात ना? असाल तर स्वागत. पण मांस खाता का, कांदा-लसूण खाता का, कपडे कोणते वापरता, भाषा कोणती आहे तुमची?...' नंतर सुरू होते नकार-मालिका. पंडित रामदयाळ मालक आहे. तो ठरवील त्यांनीच इथे राहायचं आहे. (मी मालक आहे इथला, समजलंऽ?... प्रोप्रायटर!) पण पंजाबी सुतार त्याला कामगार म्हणून चालतो. मल्याळी मजूर, मद्रासी रंगारी त्याला पसंत आहे. पण त्यांनी प्रॉपर्टीत स्थान मागू नये, हक्क मागू नये, राहण्याची मुभा मागू नये. श्रमाचं शोषण चालतं, 'क्लेम' चालत नाही. मूळ कारण 'हेट' हे आहे. विद्वेष आणि तिरस्कार हे आहे.

नाटकाची लेखनव्यवस्था म्हणून काही सामग्री हेतुत: गोळा करण्यात आली आहे. 'कमलकुंज' ही नवी इमारत (नवा देश!) बनवण्यासाठी इथे बहुभाषी, वेगवेगळ्या प्रदेशांत राहणारे कामगार-तंत्रज्ञ एकत्र आले आहेत. याचा अर्थ असा की, हा देश सर्वांनी सर्ववंशीयांनी, सर्व जातींनी आणि सर्वधर्मीयांनी घडवला. राज्यकर्त्यांना साहाय्यक मुनीमही पाहिजेच असतात. इमारतीचा- कमलकुंजचा मुनीम मिर्झा हा मुसलमान आहे. हा वीस वर्षांपासून काम करतो, पण याला अधिकार नाहीत. हा मुसलमानास घर भाड्याने देण्यासाठी शब्द टाकू शकत नाही. त्याचं 'फ्रस्ट्रेशन' नाटकात व्यक्त झालं आहे. म्हणजेच राज्यकर्त्यांना मुसलमान मुनीम चालतो,

फक्त त्याने त्याची मर्यादा पाळावी. (दोघेही वेगवेगळ्या डब्यातून पान खातात!)

नाटककाराला 'कमलकांत'कडून- नव्या पिढीकडून खूप अपेक्षा आहेत, आशा आहेत. ही पिढी आधुनिक विचारांची आहे. ही नव्या युगातली तरुण मंडळी पारंपरिक जळमटं नाकारतील आणि 'लिहिली जात असलेली विद्वेषाची कथा' मिटवतील, खोडून टाकतील- अशी अपेक्षा नाटककार व्यक्त करतो. (हा चाव्यांचा गुच्छ तुला द्यायला मी परत आलोऽ!) सूत्रं आता नव्या पिढीकडे जावीत, हे सूचन नाटकात आहे. पुढच्या पिढीने सूत्रं स्वीकारली असतील; पण 'मनाचे दरवाजे आणि मेंदूतल्या खिडक्या' उघडल्या का, हा प्रश्न आहे.

नाटककार प्रतीकांशी खेळतो. ही प्रतीकं गूढ अशी नाहीत, पण 'दरवाजा, खिडकी आणि स्टूल' हे फर्निचर म्हणून विकत घेण्याच्या अटीवर वाचक म्हणून मी अडखळलो. या फर्निचरची किंमत चार हजार का आहे, याचं स्पष्टीकरण देताना पहिला मुसलमान ग्राहक 'या दरवाजांना मनुष्याची कातडी लावली आहे' असं उपहासानं म्हणतो; तेव्हा मी खूश झालो. माझ्यासारख्या लेखकाला हे प्रतीक सापडलं असतं तर या प्रतीकाशी किती खेळता आलं असतं आणि लेखनीला किती फांद्या फुटल्या असत्या! कृष्ण चंदर यांनी मात्र ही संभाव्य 'फँटसी' पुढे नेली नाही. मात्र उपहास, व्यंग याचा पुरेपूर वापर होत राहिला आहे. सर्वच पात्रांनी नाटकाच्या शेवटी हळूहळू एकत्र होणे आणि आनंदी संगीताच्या तालावर नाटक संपणे, ही त्या वेळची आधुनिक पद्धत असणार. नाटकात हा आशावाद आवश्यकच होता. भारतीय माणसाचं 'वैचारिक परिवर्तन' जवळजवळ अशक्य असतं. अध्यात्म मात्र परिवर्तन आणू शकते. म्हणून पंडित रामदयाळला मरावं लागलं आहे आणि मरून परत यावं लागलं आहे. दरम्यान, त्याला इमारतीचा (देशाचा!) आत्मा भेटला आहे. या 'फँटसी'चा वापर केल्यानंतरच अपेक्षित असा तोडगा सांगितला जातो. सर्वांना बोलवा, सर्वांसाठी दारं सताड उघडा, सर्वांचा हक्क-योगदान मान्य करा... 'दरवाजे खोल दोऽ'- हा तो तोडगा.

: ५ :

'काळ तर मोठा कठीण आला' असं काळाच्या प्रत्येक टप्प्यावर लेखकाने म्हटलं आहे. 'काळ' ही संकल्पना भव्य अशीच आहे. आपल्या परंपरेत या संकल्पनेचा मनोज्ञ वापर करण्यात आला आहे. भर्तृहरी म्हणतो की, दिवस आणि रात्रीच्या एका आड असलेल्या काळ्या-पांढऱ्या सारीपाटावर स्त्री-पुरुषांच्या सोंगट्या भिरकावून काळ स्वत:च खेळ मांडतो आहे आणि स्वत:च खेळ पाहतो आहे.

'काळा'ने बोटाला धरून आपल्याला वेगवेगळ्या युगांतून प्रवास घडवला. यंत्रयुग, मग अणुयुग, मग अवकाशयुग, आधुनिक तंत्रयुग- असा प्रवास करीत आपण आता 'भ्रमयुगात' प्रवेश केला आहे. आपण भ्रमित होतो आहोत आणि बधिरदेखील होतो आहोत. भोवताली विद्वेषाची कथा- 'हेट स्टोरी'- लिहिली जातेय. या कथेचा अन्वयार्थ लावणं अवघड झालं आहे. आपल्याला सगळ्यांचा विश्वास पण पाहिजे आहे आणि ध्रुवीकरण पण पाहिजे आहे. नाव विचारून मगच भाजी आणि फळं विकत घेणं, मुसलमान गाडीवाल्याला 'आपल्या क्षेत्रातून' हाकलून देणं, मारहाण करणं, नफरत पसरविणं, 'नो एंट्री'च्या पाट्या लावणं- हे सगळं घडत असताना सर्वत्र प्रगाढ असं 'चतुर मौन' पसरलेलं आहे आणि आपल्याला 'सबका विकास' पाहिजे आहे. दलित-बहुजनांच्या मनात संशय निर्माण झाला आहे आणि आपल्याला 'सबका साथ' पाहिजे आहे. प्रमुख प्रवाहाचा 'रुग्ण अहंकार' वाढतो आहे. हे सगळं भ्रमयुगात घडणं शक्य आहे, तसंच घडतं आहे. हे आपल्याला कुठे घेऊन जाणार? पंडित रामदयाळच्या आत्म्याला 'देशाचा आत्मा' भेटतो आणि सांगतो की- हा रस्ता कुठेच घेऊन जात नसतो. ज्या घराचे दरवाजे आणि खिडक्या सताड उघड्या आहेत, त्याच घराचे मालक सद्गती प्राप्त करतात. 'दरवाजे खोल दो-' या साठ वर्षांपूर्वीच्या उर्दू नाटकाचं स्मरण आपल्याला या 'भ्रमयुगात' करावं लागतं. आपल्या समस्यांची त्यात चर्चा आहे आणि सोल्युशन पण नोंदवलं आहे. हे सोल्युशन बाळबोध वाटलं तरी तारक आहे. दुसरा कोणताच मार्ग नाही. आपल्या चिंतनात कृष्ण चंदर यांनी हेच म्हटलंय, 'दूसरा कोई रास्ता नहीं...'

लेखकाच्या कर्तव्याचा भाग म्हणून या उर्दू नाटकाचा मी मराठीतून अनुवाद केला आणि आपल्यासमोर प्रस्तुत केला आहे. अशीच नाटकं, असेच स्वच्छ विचार आपल्याला तारणार आहेत, यापुढे!

**भारत सासणे**, पुणे

Ph. : 020-25660922 / Mob. : 9422073833

Email : bjsasne@yahoo.co.in

# जांभळाचे झाड

## मूळ हिंदी कथा : कृष्ण चंदर

मराठी अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ

उर्दू व हिंदी या दोन्ही भाषांमधून कथा, कादंबरी व नाटक हे तिन्ही साहित्यप्रकार हाताळणाऱ्या कृष्ण चंदर यांनी 'जामून का पेड' ही हिंदी कथा १९६० च्या दशकात लिहिली. आपल्या नोकरशाहीच्या कारभारावर उपरोध, उपहास व वक्रोक्ती यांच्या माध्यमातून दृष्टिक्षेप टाकणारी ही कथा आहे. २०१५ पासून केंद्रीय शाळांच्या इयत्ता दहावीच्या हिंदी भाषेच्या पाठ्यपुस्तकात ही कथा आहे. मात्र सहा महिन्यांपूर्वी शिक्षण खात्याकडून असा आदेश आलेला आहे की, २०२० व २१ या वर्षी ही कथा विद्यार्थ्यांना शिकवण्यात येऊ नये, तिच्यावर परीक्षेसाठी प्रश्नही विचारले जाऊ नयेत. थोडक्यात, ही कथा अभ्यासक्रमातून मागे घेण्यात आली आहे. याचाच अर्थ पुढील वर्षी पाठ्यपुस्तके नव्याने छापली जातील तेव्हा त्यातून ही कथा वगळली गेलेली असेल. शिक्षण विभागाने या निर्णयाचे स्पष्टीकरण दिलेले नाही, कारणमीमांसा केलेली नाही. इथे त्या कथेचा अनुवाद प्रसिद्ध करीत आहोत, साधनाच्या वाचकांनी आपापले अंदाज लढवून त्या निर्णयाची कारणे शोधावीत अशी अपेक्षा आहे..!

... संपादक

रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वारा सुटला. सचिवालयाच्या लॉनवरील जांभळाचे एक झाड उन्मळून पडले. सकाळी जेव्हा माळ्याने ते पाहिले, तेव्हा त्या झाडाखाली एक माणूस दबला गेला आहे, असे त्याच्या लक्षात आले.

माळी पळत-पळत शिपायाकडे आला. शिपाई पळत-पळत लिपिकाकडे गेला. लिपिक पळत-पळत अधीक्षकाकडे गेला. अधीक्षक धावत-धावत लॉनवर आला आणि मग उन्मळून पडलेल्या त्या झाडाखाली दबलेल्या माणसाभोवती काही मिनिटांत गर्दी जमा झाली.

बिचारा! जांभळाचे झाड किती बहरलेले होते. एक लिपिक म्हणाला. ''याची जांभळं किती रसदार होती!''

दुसरा लिपिक म्हणाला. ''मी फळांच्या मोसमामध्ये पिशवी भरून घेऊन जात असे... माझी मुलं या झाडाची जांभळं मोठ्या आनंदाने खात असत.''

तिसऱ्या लिपिकाने डोळ्यात अश्रू आणत म्हटले, ''पण हा माणूस...?'' माळ्याने झाडाखाली दबलेल्या माणसाकडे बघत म्हटले,

''अरे हो, हा माणूस!''

अधीक्षक विचारात पडला.

''माहिती नाही, तो जिवंत आहे की मेला आहे!'' एका शिपायाने म्हटले.

''मेला असणार. इतके मोठे झाड अंगावर पडल्यावर तो कसा वाचणार?'' दुसरा शिपाई म्हणाला.

''नाही, मी जिवंत आहे!'' दबलेल्या माणसाने मोठ्या

मुश्किलीने कण्हत-कण्हत म्हटले.

‘‘हा जिवंत आहे!’’ एका लिपिकाने आश्चर्याने म्हटले.

‘‘झाड बाजूला हटवून याला बाहेर काढायला हवे.’’ माळ्याने सल्ला दिला.

‘‘मला अवघड वाटते आहे.’’ एक नवा कर्मचारी म्हणाला, ‘‘झाडाचे खोड खूप मोठे आणि वजनदार आहे.’’

‘‘त्यात अवघड काय आहे?’’ माळी म्हणाला. ‘‘जर अधीक्षकसाहेबांनी हुकूम दिला, तर आत्ता आपण पंधरा-वीसजणं जोर लावून झाडाच्या खाली दबलेल्या माणसाला काढू शकतो.’’

‘‘माळी बरोबर बोलतो आहे.’’ बरेचसे लिपिक एकसाथ म्हणाले. ‘‘लावा जोर, आम्ही तयार आहोत.’’

एकदम खूप जणं झाड कापायला तयार झाले.

‘‘थांबा!’’ अधीक्षक म्हणाले. ‘‘मी अवर सचिवसाहेबांशी चर्चा करतो.’’

अधीक्षक अवर सचिवसाहेबांकडे गेले. अवर सचिव उपसचिवांकडे गेले. उपसचिव सहसचिवांकडे गेले. सहसचिव मुख्य सचिवांकडे गेले.

मुख्य सचिवासह सचिवाला काही म्हणाले, सहसचिव उपसचिवाला काही म्हणाले, उपसचिव अवर सचिव यांना काही म्हणाले. एक फाईल तयार झाली.

फाईल हलू लागली. फाईल पुढे-पुढे जात राहिली. यात अर्धा दिवस निघून गेला. लंच टाइमनंतर त्या झाडाखाली दबलेल्या माणसाभोवती खूप गर्दी जमा झाली होती. लोक वाट्टेल ते बोलत होते. काही धीट लिपिक पुढे झाले. त्यांनी या बाबतीत पुढाकार घ्यायचे ठरवले.

ते हुकमाची वाट न पाहता ते झाड हटवायची तयारी करू लागले होते. इतक्यात अधीक्षक फाईल घेऊन धावत-धावत आले. म्हणाले, ‘‘आपण स्वतः हे झाड इथून हलवू शकत नाही. आपण वाणिज्य विभागाशी संबंधित आहोत आणि हे झाड कृषी विभागाच्या ताब्यात आहे. त्यामुळे मी ही फाईल शेरा लिहून कृषी विभागाकडे पाठवतो आहे. तिथून उत्तर येताच हे झाड हटवण्यात येईल.’’

दुसऱ्या दिवशी कृषी विभागाकडून उत्तर आले की, झाड हटवण्याची जबाबदारी वाणिज्य विभागाची आहे. हे वाचून वाणिज्य विभागाला राग आला. त्यांनी ताबडतोब लिहिले



की, झाड हटवण्याची किंवा न हटवण्याची जबाबदारी कृषी विभागाची आहे. वाणिज्य विभागाचा याच्याशी काही संबंध नाही.

दुसऱ्या दिवशीदेखील फाईल चालत राहिली. संध्याकाळी उत्तरदेखील आले. आम्ही ही केस फलोद्यान विभागाकडे सोपवत आहोत, कारण ही केस फळझाडाची आहे. आणि कृषी विभाग फक्त धान्य आणि शेती यासंबंधी निर्णय करू शकते. तेवढाच अधिकार त्यांना आहे. जांभळाचे झाड हे फळझाड आहे. त्यामुळे हे झाड फलोद्यान विभागाच्या अधिकारक्षेत्रात येते.'

अर्थात लॉनच्या चारही बाजूला पोलीस पहारा होता. लोकांनी कायदा हातात घेऊन झाड हटवायचा प्रयत्न करू नये, हाच यामागचा उद्देश होता. पण एका पोलीस कॉन्स्टेबलला दया आली आणि त्याने माळ्याला त्या झाडाखाली अडकलेल्या माणसाला खाऊ घालायची परवानगी दिली. रात्री माळ्याने त्या झाडाखाली दबलेल्या माणसाला वरण-भात खाऊ घातला.

माळ्याने त्या दबलेल्या माणसाला म्हटले, ''तुझी फाईल चालली आहे. आशा आहे की, उद्यापर्यंत निर्णय होईल.''

यावर दबलेला माणूस काही बोलला नाही.

माळ्याने झाडाच्या खोडाकडे पाहून म्हटले. ''बरं झालं, झाड तुझ्या कुल्ल्यावर पडले. कमरेवर पडले असते, तर तुझा कणाच मोडला असता.''

दबलेला माणूस यावरदेखील काही बोलला नाही.

माळी पुन्हा म्हणाला, ''इथे तुझा कुणी वारस असेल तर मला त्याचा पत्ता सांगून ठेव. मी त्याच्यापर्यंत ही बातमी पोहोचवण्याची व्यवस्था करतो.''

''मी अनाथ आहे.'' दबलेल्या माणसाने मोठ्या मुश्किलीने सांगितले.

माळी दुःख व्यक्त करून तिथून निघून गेला.

तिसऱ्या दिवशी फलोद्यान विभागाकडून उत्तर आले. उत्तर कडक आणि उपहासपूर्ण होते. फलोद्यान विभागाचे सचिव शिष्टाचार पाळणारे होते.

त्यांनी लिहिले : आश्चर्य आहे. या वेळी 'झाडे लावा, झाडे जगवा' ही मोहीम सुरू आहे आणि आमचे काही अधिकारी मात्र झाड कापण्याचा सल्ला देत आहेत- तेही एक फळझाड तोडण्याचा. तोही जांभळाचे झाड तोडण्याचा सल्ला दिला जातोय, ज्याची फळं लोक मोठ्या चवीने खातात. आमचा विभाग हे झाड तोडण्याची परवानगी कधीही देणार नाही.

''आता काय करणार?'' एका धीट माणसाने विचारले.

''जर हे झाड तोडता येत नसेल, तर या माणसाला कापून बाहेर काढावे. हे पाहा, तो माणूसही खुणेने हेच सांगतो आहे. या माणसाला मधून कापले, तर आर्धा माणूस या बाजूने निघेल आणि अर्धा माणूस दुसऱ्या बाजूने निघेल. मग झाड जागच्याजागी तसेच राहील.''

''पण अशा पद्धतीने तर मी मारून जाईन!'' दबलेल्या माणसाने काळजीने सांगण्याचा प्रयत्न केला.

''याचे म्हणणे बरोबरच आहे.'' एक लिपिक म्हणाला.

माणसाला कापून बाहेर काढण्याचा प्रस्ताव मांडणाऱ्याने तो प्रस्ताव पुढे रेटायला सुरवात केली. ''तुम्हाला माहिती नाही, आजकाल कापलेल्या माणसाला प्लॅस्टिक सर्जरीने पुन्हा जोडले जाऊ शकते.''

आता ती फाईल वैद्यकीय विभागाकडे पाठवण्यात आली. वैद्यकीय विभागाने त्यावर लगेचच कार्यवाही केली आणि ज्या दिवशी फाईल मिळाली, त्याच दिवशी त्या विभागातील सगळ्यात यशस्वी प्लॅस्टिक सर्जनला चौकशी करण्यासाठी पाठवून दिले.

सर्जनने दबलेल्या माणसाचे चहू बाजूने निरीक्षण केले. त्याची प्रकृती पाहून, रक्तदाब-नाडी-हृदयाची तपासणी करून रिपोर्ट पाठवला. 'या माणसाची प्लॅस्टिक सर्जरी होऊ शकते आणि ऑपरेशनदेखील यशस्वी होऊ शकते, पण माणूस मारून जाईल.'

त्यामुळे हा विचारही सोडून देण्यात आला.

रात्री माळ्याने त्या दबलेल्या माणसाच्या तोंडात खिचडीचे घास भरवत त्याला सांगितले, ''आता हा मामला वर गेला आहे. असं ऐकलंय की, साऱ्या सचिवांची मीटिंग होणार आहे. त्यात तुझ्या केसवर चर्चा केली जाईल. आशा आहे की, सगळं काही ठीक होईल.'''

दबलेल्या माणसाने उसासा सोडत म्हटले, ''हमने माना कि तगाफुल न करोगे। लेकिन ख़ाक हो जाएंगे हम, तुमको खबर होने तक!''

माळ्याने आश्चर्याने तोंडात बोटं घातली. तो म्हणाला, ''तू शायर आहेस?''

दबलेल्या माणसाने मान हलवली.

दुसऱ्या दिवशी माळ्याने शिपायाला सांगितलं. शिपायाने लिपिकाला. लिपिकाने मुख्य लिपिकाला. थोड्या वेळातच

ही गोष्ट सचिवालयापर्यंत पोहोचली की, झाडाखाली दबलेला माणूस शायर आहे.

बस, मग काय... लोक झुंडीने शायरला बघायला येऊ लागले. याची बातमी शहरात पसरली. संध्याकाळपर्यंत गल्ली-बोळातून शायर जमायला सुरुवात झाली. सचिवालायाचे लॉन शायरांनी भरून गेले. सचिवालयामधील किती तरी लिपिक आणि अवर सचिव यांना शायरी आवडत होती. तेही थांबले.

काही शायर त्या दबलेल्या माणसाला आपली शायरी ऐकवू लागले. काही लिपिकांनी आपल्या काव्यातील चुका विचारायला सुरुवात केली.

जेव्हा समजले की, दबलेला माणूस शायर आहे- तेव्हा सचिवालयाच्या उपसमितीने  निर्णय घेतला की, हा माणूस शायर असल्याने या माणसाचा संबंध कृषी विभागाशी नाही की फलोद्यान विभागाशी नाही, तर फक्त सांस्कृतिक विभागाशी आहे.

सांस्कृतिक विभागाला विनंती करण्यात आली की, लवकरात लवकर या प्रकरणाचा निकाल लावून त्या शायराला त्या सावली देणाऱ्या झाडापासून मुक्ती देण्यात यावी.

ती फाईल सांस्कृतिक विभागात अनेक टेबलांवर फिरून सचिवाकडे पोहोचली. बिचारा सचिव या वेळी आपल्या गाडीतून सचिवालयामध्ये पोहोचला आणि दबलेल्या माणसाची मुलाखत घेऊ लागला.

''तू शायर आहेस?'' त्याने विचारले.

''जी हाँ.'' त्या दबलेल्या माणसाने उत्तर दिले.

''कोणत्या नावाने लिहितोस?''

''अवस.''

''अवस!'' सचिव किंचाळलाच. ''कायऽऽ तू तोच आहेस का, ज्याचा कवितासंग्रह 'अवस के फूल' अलीकडेच प्रकाशित झाला आहे?''

दबलेल्या शायरने या गोष्टीवर फक्त मान हलवली.

''तू आमच्या अकादमीचा मेंबर आहेस?'' सचिवाने विचारले.

''नाही.''

''आश्चर्य आहे!'' सचिव किंचाळलाच. ''अवस के फूलचा कवी आणि आमच्या अकादमीचा मेंबर नाही? चूक झाली आमच्याकडून. किती मोठा शायर आणि कुणाला माहितीदेखील नाही!''




''सध्या मी या झाडाखाली दबलो आहे... कृपा करून मला या झाडाखालून बाहेर काढा.''

''आत्ता व्यवस्था करतो'' सचिव म्हणाला. आणि त्याने आपल्या विभागात जाऊन घाईघाईने अहवाल सादर केला.

दुसऱ्या दिवशी सचिव पळत-पळत त्या शायराकडे आला आणि म्हणाला, ''मुबारक हो. मिठाई खाऊ घाल. आमच्या सरकारी अकादमीने तुला केंद्रीय समितीचा सदस्य म्हणून निवडले आहे! हे घे निवड झाल्याचे पत्र.''

''पण तुम्ही मला या झाडाखालून बाहेर काढा.'' त्या दबलेल्या माणसाने कण्हत-कण्हत म्हटले. त्याला श्वास घ्यायला त्रास होत होता. त्याच्या डोळ्यांवरून वाटत होते की, त्याला खूप त्रास होतो आहे.

''हे आम्ही करू शकत नाही.'' सचिव म्हणाले. ''जे आम्ही करू शकत होतो, ते आम्ही केले. आम्ही हेदेखील करू शकतो की, जर तू मेलास तर तुझ्या पत्नीला नुकसानभरपाई देऊ शकतो.''

''पण मी जिवंत आहे.'' शायर थांबत-थांबत म्हणाला. ''मला जिवंत ठेवा.''

''हे अडचणीचे आहे.'' सरकारी अकादमीचा सचिव हात चोळत म्हणाला. ''आमचा विभाग फक्त सांस्कृतिक बाबींशी संबंधित आहे. यासाठी आम्ही वन विभागाला लिहिले आहे.''

संध्याकाळी माळ्याने येऊन त्याला सांगितले, ''उद्या

वन विभागाची माणसे येऊन हे झाड कापतील आणि तुझी सुटका होईल.''

माळी खूप खूश होता. पण त्या दबलेल्या माणसाची अवस्था बिकट होत चालली होती. तो जीवनाची लढाई लढत होता. त्याला उद्या सकाळपर्यंत कसे तरी जिवंत राहायचे होते.

दुसऱ्या दिवशी वन विभागाची माणसे करवती आणि कुऱ्हाडी घेऊन झाड तोडण्यासाठी आली, तेव्हा त्यांना अडवण्यात आले. विदेश विभागाकडून तसा आदेश आला होता.

त्याचे कारण असे होते की, दहा वर्षांपूर्वी हे झाड पिटोनियाच्या पंतप्रधानांनी ते भारत भेटीवर आले तेव्हा लावलेले होते. आता जर हे झाड कापले गेले तर, त्यांचे आणि आपले संबंध कायमचे बिघडण्याची शक्यता होती.

''पण एका माणसाच्या प्राणाचा प्रश्न आहे!'' एक लिपिक रागाने ओरडला.

''दुसऱ्या बाजूला दोन देशांतील संबंधांचा प्रश्न आहे.'' दुसऱ्या लिपिकाने पहिल्याला समजावले. ''आणि हे तर लक्षात घे की, आपल्या देशाला त्यांच्याकडून किती तरी निधी मिळतो. मग आपण या मैत्रीसाठी एका माणसाच्या प्राणाची आहुती देऊ शकत नाही?''

''शायरने मरणे आवश्यक आहे?''

''हो.''

अवर सचिवाने अधीक्षकांना सांगितले, 'आज पंतप्रधान बाहेरच्या देशाच्या दौऱ्यावरून परत आले आहेत. ''आज विदेश विभाग ती फाईल त्यांच्यासमोर सादर करेल. ते जो निर्णय घेतील, तो सगळ्यांना मंजूर असेल.''

संध्याकाळी पाच वाजता स्वतः अधीक्षक शायरची फाईल घेऊन त्याच्याजवळ आले. ''ऐकलंस का?'' येताच फाईल हलवत आनंदाने किंचाळले. ''माननीय पंतप्रधानानी झाड कापायला मंजुरी दिली आहे आणि या घटनेची सगळी आंतरराष्ट्रीय जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. उद्या हे झाड कापले जाईल आणि तुझी या संकटातून सुटका होईल. ऐकलंस का? आज तुझ्या फाईलवर निर्णय झाला!''

अधीक्षकांनी शायरच्या दंडाला स्पर्श करून म्हटले. पण शायरचा हात थंड पडला होता, डोळे निर्जीव झाले होते. मुंग्यांची एक मोठी रांग त्याच्या तोंडात जात होती.

त्याच्या जीवनाची फाईलदेखील तयार झाली होती.

(मराठी अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ)

bhonjalck@gmail.com
Mob.9757061772

**कृष्ण चंदर (१९१४-७७)**

कृष्ण चंदर यांचा जन्म व सुरुवातीचा कालखंड आताच्या पाकिस्तानात गेला. त्यानंतर कथा-कादंबरी व नाटक हे तीनही साहित्यप्रकार त्यांनी विपुल प्रमाणात हाताळले. काही चित्रपटांच्या पटकथाही लिहिल्या. त्यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने सन्मानितकेले होते. 'सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कारा'ने गौरविण्यात आले होते. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी आपली लेखणी सोडली नाही. दि.८ मार्च १९७७ रोजी त्यांचे मुंबईमध्ये निधन झाले, त्या वेळी त्यांच्या हातात लेखणी होती. मृत्यूच्या वेळी ते एक व्यंग्य लिहीत होते. त्यांनी फक्त एक ओळ लिहिली होती, त्याच वेळी त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. शेवटच्या दिवसांत ते आत्मकथेवर काम करीत होते, पण ती त्यांच्या हातून पूर्ण झाली नाही. त्यानंतर त्यांची पत्नी सलमा सिद्दिकी यांनी ती पूर्ण केली. ते आयुष्यभर मानवतावादी राहिले. त्यांनी लेखनातून हिंदू-मुस्लिम यांच्यातील संघर्षाला नेहमी विरोध केला. समाजातील दलित-शोषित वर्गाच्या हक्कांसाठी त्यांची लेखणी नेहमी आग ओकत राहिली. आपले भावपूर्ण लेखन, जमिनीशी जोडली गेलेली पात्रं आणि 'सर्वहारा वर्गा'चे सजीव चित्रण यासाठी ते वाचकांच्या मनात नेहमी जिवंत राहतील.


Today's good mood is brought to you by
monginis
Go ahead. Celebrate!
Get this Designer Ceramic Mug worth ₹200/- FREE*
Bloom your happiness with
*on purchase of 1.5 Kg & above Monginis Birthday Cake, Wedding Cake or Special Cake. T&C apply. Limited period offer.
Have you tried our latest items ?
New items launched every month
Prawns Rissois
Duet Choco Bix
Chicken Chops
Brownie Magic
Chocolate Croissant

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 4-6-2020 / Date of Publication : 4-6-2020


# लॉकडाऊन काळातील प्रदीर्घ सुट्टीनंतर साधना प्रकाशनाच्या पुस्तकांची विक्री सुरू झाली...

साधना प्रकाशनाची सध्या ११० पुस्तके उपलब्ध आहेत, त्या सर्व पुस्तकांची थोडक्यात व नेमकी माहिती देणारी सूची मिळवण्यासाठी Mob : 70582 86753 या whats app नंबरवर मेसेज पाठवा किंवा weeklysadhana.in या वेबसाइटवरून ही सूची डाऊनलोड करून घ्या.

## ही पुस्तके मिळवण्यासाठी तीन पर्याय आहेत

**१.**

साधना प्रकाशनाचे, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथील कार्यालय सकाळी १० ते ८ या वेळेत खुले आहे, तिथून थेट खरेदी करता येतील. सर्व पुस्तके ४० टक्के सवलतीत उपलब्ध.

**२.**

साधनाच्या बँक खात्यात रक्कम जमा केली आणि कोणती पुस्तके हवीत ते फोन वा मेल द्वारे कळवले तर पोस्ट वा कुरिअर सेवा चालू असणाऱ्या ठिकाणी पाठवली जातील. सर्व पुस्तके ४० टक्के सवलतीत, मात्र ती पाठवण्यासाठीचा खर्च वेगळा असेल.

**३.**

amazon.in या ऑनलाईन विक्री करणाऱ्या वेबसाईटवर ही सर्व पुस्तके १० ते २५ टक्के इतक्या सवलतीत उपलब्ध आहेत, देशातील प्रमुख शहरांमध्ये ती घरपोच सेवा उपलब्ध आहे, मात्र त्यांचा कुरिअर खर्च वेगळा असेल.

अधिक माहितीसाठी संपर्क

## साधना प्रकाशन

४३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph 02024459635, Mob : 70582 86753
mediasadhana@gmail.com ■ sadhana.prakashan@gmail.com